www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 340 मंगळवार दि. 26 ऑगस्ट २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514

# "गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका", मनोज जरांगेंना उद्देशून केलेली प्रकाश आंबेडकरांची पोस्ट चर्चेत

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे हे त्यांच्य आरक्षणाच्या मागणीसाठी येत्या २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणासा बसणार आहेत. यापूर्वी मनोज जरांगे यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळत आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासह अन्य मागण्या मान्य झाल्या नाही, तर आपण राज्यातील सरकारसुध्दा उलथून टाकू शकतो, असा इशारा जरांगे-पाटील यांनी सोमवारी दिला. यादरम्यान वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेली पोस्ट चर्चेत आली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी जरांगेंच्या आंदोलनाबद्दल भाष्य करत गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका असे म्हटले आहे.



**प्रकाश आंबेडकर नेमकं काय म्हणाले?**

प्रकाश आंबेडकरांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकारच्या विरोधात लढणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांना काही प्रश्न विचारले आहेत. "मनोज जरांगे पाटील, तुम्ही मराठ्यांच्या आरक्षणासाठी सरकारविरुद्ध लढत आहात. पण, सरकारमध्ये कोण आहे? आताच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे, अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, अशोक चव्हाण, नारायण राणे सारखे प्रस्थापित मराठा आहेत," असे प्रकाश आंबेडकर त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. इतकेच नाहीतर अडीच वर्षांपूर्वी महाविकास आघाडीचे सरकार असताना देखील अनेक प्रस्थापित मराठा सत्तेत होते होते. ज्यामध्ये शरद पवार, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात यांचा समावेश होता असेही प्रकाश आंबेडकरांनी नमूद केले आहे.

**मराठ्यांसाठी आंदोलन करत आहात पण**

"तुम्ही निवडणुकीत या श्रीमंत मराठ्यांचा प्रचार केला आणि त्यांना मतदान केले. तुम्ही गरीब मराठ्यांसाठी आंदोलन करत आहात पण, गरीब मराठ्यांना वंचित ठेवणाऱ्या श्रीमंत मराठ्यांना तुम्ही पाठिंबा देत आहात. गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका," असे अवाहन प्रकाश आंबेडकरांनी केले आहे.

"लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत तुम्ही श्रीमंत मराठ्यांना पाठिंबा दिला होता. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तुम्ही पुन्हा तीच भूमिका घ्याल आणि गरीब मराठ्यांना मूर्ख बनवाल का?" असा सवालही आंबेडकरांनी या पोस्टच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांना विचारला आहे.

मनोज जरांगे पाटील, तुम्ही मराठ्यांच्या आरक्षणासाठी सरकारविरुद्ध लढत आहात. पण, सरकारमध्ये कोण आहे? आताच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे, अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, अशोक चव्हाण, नारायण राणे सारखे प्रस्थापित मराठा आहेत.

**२९ ऑगस्टला आझाद मैदानावर आंदोलन**

अंतरवाली सराटी येथे सोमवारी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना जरांगे यांनी माहिती दिली की, २७ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता अंतरवाली सराटी येथून शहागड, पैठण, शेवगाव, पांढरी पूल, आळेफाटा मार्गे मराठा समाज शिवनेरी गडावर मुक्कामासाठी पोहोचेल. तर दुसऱ्या दिवशी चाकण, लोणावळा, वाशी, चेंबूरमार्गे रात्री मुंबईत आझाद मैदानावर पोहोचेल. २९ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता उपोषणास सुरुवात होईल. आंदोलनाच्या ठिकाणी कीर्तन, भजन आणि शाहिरांच्या पोवाड्यांचे कार्यक्रम होतील.

# मुंबई मोर्चात सकल मराठा मोठ्या संख्येने सहभागी व्हावे -सागर आमले यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**



मराठा समाजाला आरक्षण मिळावे या दीर्घकाळ प्रलंबित मागणीसाठी सकल मराठा समाज मनोज दादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली २९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे भव्य मोर्चा काढणार आहे. या ऐतिहासिक लढ्यात बीड जिल्ह्यातील सर्व मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा सेवक सरपंच सागर आमले यांनी केले आहे.

शासन वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकार वेळकाढूपणा करत असून ठोस धोरण जाहीर करण्यास टाळाटाळ करत आहे. मागील काही महिन्यांपासून मनोज दादा जरांगे पाटील हे शासन दरबारी ठामपणे लढा देत आहेत. मात्र अद्यापही समाधानकारक निर्णय जाहीर झालेला नाही. त्यामुळे आता मराठा समाजाची ताकद दाखवण्याची वेळ आली असल्याचे सागर आमले यांनी स्पष्ट केले.

"आता नाही तर कधीच नाही"

या मोर्चाचे महत्त्व अधोरेखित करताना आमले म्हणाले, "मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आता प्रत्येक मराठा बांधवाने आर किंवा पार या चळवळीत सहभागी व्हावे. ही लढाई केवळ एका समाजाची नाही तर अन्यायाविरुद्धची आहे. समाजाची ताकद सरकारपुढे दाखवण्याची हीच वेळ आहे. आता नाही तर कधीच नाही."

मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

मुंबई मोर्चासाठी बीड जिल्ह्यातील मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावावी, कोणतेही कारण न देता सर्वांनी या लढ्यात सामील व्हावे, असे आवाहन आमले यांनी केले. त्यांनी स्पष्ट केले की, हा मोर्चा केवळ आंदोलन नसून मराठा समाजाच्या भवितव्याशी निगडीत आहे.

ऐतिहासिक ठरणार मुंबई मोर्चा

२९ ऑगस्ट रोजी होणारा मुंबई मोर्चा सकल मराठा समाजाच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे. राज्यभरातून लाखोंच्या संख्येने मराठा बांधव या मोर्चात सहभागी होणार असून, सरकारसमोर समाजाची एकजूट आणि ताकद ठळकपणे दाखवली जाणार आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा'

## पुरुष गटात श्री. सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळ तर महिला गटात शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळ ठरले मानकरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



गोरगरिबांचे आधारवड, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धेच्या पुरुष गटात म्हसळ्याच्या श्री. सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळाने तर महिला गटात कर्जतच्या शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक जयंत पगडे, भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांच्यासह वारकरी संप्रदायातील मान्यवर तसेच आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.

पुरुष गटात द्वितीय क्रमांक सुरताल भजन मंडळ नारंगी, तृतीय क्रमांक श्री. हनुमान प्रासादिक भजन मंडळ खारघरने तर उत्तेजनार्थ पारितोषिक अलिबागच्या स्वरविहार भजन मंडळाने पटकावले. यामध्ये उत्कृष्ट पखवाज वादक म्हणून श्री. हनुमान प्रासादिक भजन मंडळाचे कुणाल पाटील आणि उत्कृष्ट तबला वादक भूषण गायकर ठरले. महिला गटात द्वितीय क्रमांक आई एकविरा महिला भजन मंडळ दुन्द्रेपाडा, तृतीय क्रमांक श्री. सद्गुरूकृपा प्रासादिक महिला भजन मंडळ चिंचवली आणि उत्तेजनार्थ पारितोषिक श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळ नेरळ यांनी पटकाविले. उत्कृष्ट पखवाज वादक म्हणून कै. वैयजंती माता भजन मंडळ रसायनीचे ओमकार तराळे तर आई एकविरा भजन मंडळाचे रोहन पाटील उत्कृष्ट तबला वादकचे मानकरी ठरले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. **पान २ वर**

# !!गण गण गणात बोते!! जय गजानन!! च्या जयघोषात ऋषिपंचमी निमित्त पालोद ते शेगांव पायी दिंडी रवाना..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** : -ऋषिपंचमी निमित्त सिल्लोड तालुक्यातील पालोद येथून सालाबादप्रमाणे शेगांव पायी दिंडी या वर्षी ही अखंडित परंपरा कायम ठेवून ५४ वी पायी दिंडी रविवारी (दि.२४ ) सकाळी पालोद ते शेगांव कडे रवाना झाली.

दिंडीत 'माऊली, माऊली' हाच एकमेव संवाद असतो. इथे नाव, पद, जात पात, भाषा, प्रांत काहीच लागत नाही. सगळे समान, सगळे भक्त. 'माऊली' म्हणणं ही आपल्या भक्तीची खरी अभिव्यक्ती आहे.

ऋषिपंचमी निमित्त तालुक्यातील पालोद येथील भाविक दरवर्षी शेगाव येथे पायी जातात.५४ वर्षापासून ही परंपरा कायम असून या वर्षी ही पायी दिंडी गण गण गणात बोते,जय गजानन या जयघोषात रविवारी रवाना झाली आहे.यात जवळपास ११० नवतरुण वारकरी भाविक पायी दिंडीने शेगांव कडे रवाना झाले आहेत.गुरूवारी (दि.२८) ऋषी पंचमीच्या दिवशी ही दिंडी संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज संस्थान शेगांव येथे पोहोचेल.प्रसंगी दिंडीला संपूर्ण पालोद ग्रामस्थांनी वारकऱ्यांचे स्वागत करून दिंडीला मार्गस्थ







**इथे ओलांडल्या जाती-धर्मांच्या भिंती, माऊलीचा मुस्लिम सेवेकरी**

या दिंडीत मुस्लिम सेवेकरी रईस पठाण यांनी जाती -धर्माच्या भिंती ओलांडून अविरत १० वर्षापासून दिंडीतील पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या वैद्यकीय सेवेपासून ते चहापाणी ,जेवण आदि गोष्टिची सेवा ते अखंडपणे निस्वार्थ करत आहे. वारकऱ्यांची सेवा करून एक आत्मिक समाधान लाभते व जाती धर्मामध्ये एकोपा निर्माण होऊन शांततेचा संदेश जातो असे त्यांनी यावेळी सांगितले. त्यांच्या या सेवेबद्दल ग्रामस्थांकडून व वारकऱ्यांकडून त्यांचे कौतुक होत आहे.

# २२७० विद्यार्थ्यांचा सहभाग – भाजप प्रणित गजानन महाराज न्यू गणेश मित्र मंडळाचा पर्यावरणपूरक उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर :**

भारतीय जनता पार्टी प्रणित गजानन महाराज न्यू गणेश मित्र मंडळाच्या वतीने यावर्षी प्रथमच "पर्यावरणपूरक शाडू माती गणेश मूर्ती कार्यशाळा" भव्य प्रमाणात आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत शहरातील अकरा वार्डांमधून तब्बल २२७० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



या उपक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री मा. श्री. अतुलजी मोरेश्वर सावे (इतर मागास व बहुजन कल्याण, अपंग कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा विभाग) यांच्या हस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,

"गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. पण सणासोबत पर्यावरणाची जबाबदारी आपली आहे. शाडू मातीच्या मूर्तींद्वारे आपण प्रदूषण कमी करू शकतो व भावी पिढीला पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे महत्त्व पटवून देऊ शकतो. या कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा उत्साह कौतुकास्पद असून त्यांनी भविष्यात हा संदेश समाजात नक्कीच रुजवावा."

राजा रविवर्मा चित्रकला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी या कार्यशाळेसाठी विशेष सहकार्य केले. महाविद्यालयाच्या प्रशिक्षिका कुमारी शाल्वी ताई दंडे यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणेश मूर्ती घडविण्याचे यशस्वी प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःहून आकर्षक व सुंदर मूर्ती साकारल्या.

या कार्यक्रमात भाजपा शहर जिल्हा अध्यक्ष श्री. किशोरजी शितोळे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की,

"आजचा हा उपक्रम फक्त मूर्ती घडविण्यापुरता मर्यादित नाही, तर तो समाजात पर्यावरणपूरक सणाची नवी जाणीव निर्माण करणारा आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचा सहभाग हा प्रेरणादायी असून ही पुढची पिढी पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेईल याची खात्री वाटते."

या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

संस्थापक अध्यक्ष श्री. अर्जुन मामा गवारे, अध्यक्ष किरण राऊत, कार्याध्यक्ष आसाराम विरकर, स्वागताध्यक्ष संतोष पाटेकर, कोषाध्यक्ष सुदाम मामा साळुंखे, महिला कार्याध्यक्षा श्रीमती आरतीताई बुटलकर, महिला अध्यक्ष श्रीमती अंजुशाताई कुलकर्णी व संयोजक लक्ष्मण थेटे आदींनी समर्पित प्रयत्न करून हा उपक्रम यशस्वी केला.

विद्यार्थी, पालक व नागरिकांकडून या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मंडळाच्या कार्याचे आणि मंत्री श्री. अतुलजी सावे तसेच श्री. किशोरजी शितोळे यांच्या मार्गदर्शनाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या भव्य उपक्रमामुळे छत्रपती संभाजीनगरात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा नवा आदर्श निर्माण झाला आहे.

# मित्रपरिवार कान्होली तर्फे भव्य तान्हा पोळा मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू नागपूर विदर्भ आवृत्ती संपादक**

कान्होली येथील पालकांनी आपल्या बालकांना नंदीची आकर्षक सजावट व पारंपरिक वेशभूषा करून श्री हनुमान मंदिर पटांगण कान्होली येथे हजेरी लावली. मित्र परिवार कान्होली तर्फे बालक व पालकांचे स्वागत केले.



गट ग्रामपंचायत धानोली (गुमगाव) तर्फे बालकांना बिस्कीट, सोनपापडी, चॉकलेट देण्यात आले. गावातील सर्व महिला बचत गटा तर्फे सर्व बालगोपाल यांना शैक्षणिक साहित्य किट देण्यात आली. तसेच उत्कृष्ट नंदी सजावट व वेशभूषा या स्पर्धेत प्रथम बक्षीस उपसरपंच मिलिंद कोवे यांच्या तर्फे पीयुष मडावी ला सायकल भेट दिली. दुसरे बक्षीस श्रेयस कोवे ला प्रदीप इटनकर यांचा तर्फे कॅरम बोर्ड देण्यात आले. तसेच प्रोत्साहन बक्षीसात साची करपते, प्रतीक वलके, अर्निका कामडी, दिगांबर टेकाम, मंथन वलके, प्रणय सलाम, विहान उमरे, भाविका सेलोकर, अर्णव हिवंज यांनी क्रमांक पटकाविला. तान्हा पोळा यशस्वीरीत्या उपसरपंच मिलिंद कोवे, प्रदीप इटनकर, रविंद्र आडे, विकास करपते, नरेंद्र वलके, प्रकाश दडमल,रेवा वलके, पुरुषोत्तम सलाम, प्रशांत करपते, अरविंद उईके, पांडुरंग कोवे, निखिल वंजारी, रुपेश इटनकर, अनिकेत बागडे, अंकेश कोवे, गौरव गोंडगे, नंदकिशोर कुमरे, निलेश खंडारे, किशोर मडावी, महादेव इरपाते, सचिन वलके, ओम वरखडे, भावेश वलके, मंगल कोवे, अरविंद कोवे, आकाश दडमल, संतोष कोवे, किसना मडावी, अक्षय गोंडगे या सर्वांनी परिश्रम घेतलेत.

# अँड जयश्री सोनवणे सांगली येथे खा.विशाल पाटील यांच्या हस्ते लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

सांगली-सोजाई आदिवासी महिला विकास फाउंडेशनच्या सचिव अँड जयश्री सोनवणे यांना ए डी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य च्या वतीने आयोजित लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जीवन गौरव पुरस्कार 2025 साहित्य, कला, पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर नावलौकिक करणाऱ्या उत्कृष्ट व आदर्श पत्रकार , वृत्त निवेदिका यांना सांगली येथे दिनांक २३/०८/२०२५ रोजी सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, मेडल देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार डॉ विशाल पाटील, सांगलीचे माजी महापौर डॉ. नितीन सावगावे यांच्या हस्ते व आदी मान्यवरांच्या उपस्थितीत देऊन सन्मानित करण्यात आले.

जयश्री सोनवणे यांचं सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रामध्ये आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवून एक विद्रोही बाणा, रोखठोकपणा उभ्या महाराष्ट्राला दाखवणारं महिला संघटन कौशल्य म्हणून उदयाला आलेलं महिलांचे कुशल नेतृत्व तथा दैनिक माझा मराठवाडा वृत्तपत्राच्या त्या निवासी संपादिका रिपब्लिकन आवाज न्यूजच्या उपसंपादिका तथा ज्ञानपंख 24 न्यूज या चॅनलच्या वृत्त निवेदिका आहेत. महिलांचे कुशल नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे आज पाहिलं जातं. त्या एक पत्रकार तर आहेतच त्यासोबतच त्या एक उत्तम कवयित्री देखील आहे. जिथे कुठे महिलांवर अन्याय अत्याचार होतो. त्या ठिकाणी अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्या हजर असतात. अनेक संस्थांना भेट देऊन गोरगरिबांना मदत मिळवून देणे, सद्य परिस्थितीवर




शाळा, कॉलेज या ठिकाणी जाऊन मुलींना परिस्थितीशी दोन हात कसे करायचे यावर मार्गदर्शन करणे. अनेक हॉस्पिटलमध्ये गोरगरिबांची फसवणूक होते. त्या ठिकाणी जाऊन त्यांची फसवणूक न होऊ देणे. त्याचबरोबर त्यांचे जे काही हॉस्पिटलचे बिल असते ते जास्तीचे आकारण्यात येते ते कमी करून देणे म्हणजेच अन्यायाविरुद्ध त्यांची लढत आहे. पुणे जिल्ह्यात नव्हे तर महाराष्ट्रात एक स्त्री म्हणून आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर पत्रकारिता सामाजिक कार्य महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे विषय घेऊन लढणाऱ्या एक लढाऊ व्यक्तिमत्व. याचं कार्याची दखल घेऊन त्यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जीवन गौरव पुरस्कार हा जाहीर करून त्यांना तो प्रदान करण्यात आला.

या घेण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शिका स्वाती कोकरे, समाज प्रभोधनकार, व्याख्याते, प्रसिध्द सांगली, उद्घाटक डॉ. गुरु बगली श्रीरना ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट सांगली स्वागताध्यक्ष विष्णू माने राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य, कार्यक्रमाचे पाहुणे इद्रीस नायकवडी विधानपरिषद, सावंत माजी विधानसभा, विशेष उपस्थिती सुजय नाना शिंदे सभापती मार्केट कमिटी सांगली, संगीता खोत माजी महापौर सांगली, संदीप सूर्यवंशी सहाय्यक पोलीस निरीक्षक, कराड, निवेदक प्रा. घनश्याम चौगुले महात्मा विद्यामंदिर हाय. व ज्यु, कॉलेज, उमदी. निमंत्रक अशोक श्रीपती गोरड, अध्यक्ष, ए.डी. फाऊंडेशन. महादेव महानूर कार्याध्यक्ष, आमदार विक्रम आमदार जत, प्रमुख फाऊंडेशन, समनडी, संयोजन समिती दिलीप वाघमोडे, शरद माने, दादासो गोरड, शेंडगे सागर म्हारनूर आदी मान्यवर, कार्यक्रमाचे आयोजक, सर्व पुरस्कारार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरस्कार्थी जयश्री वी सोनवणे यांनी यांनी प्रसार प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितलं की हा सन्मान माझा नसून समाजाचा माझ्यावर असणाऱ्या विश्वासाचा आहे. या पुरस्काराने मला आणखीन नवीन जबाबदाऱ्या दिल्या आहेत असं मला वाटतं आणि आणखी कार्य करण्याची प्रेरणा या पुरस्काराने मला मिळाली आहे. हा सन्मान शक्य झाला तो मार्गदर्शक, सहकारी आणि शुभेच्छुक यांच्या प्रेम व विश्वासामुळे. आपल्या सर्वांच्या आशिर्वादाशिवाय हे शक्य नव्हते.

त्यांना मिळाल्या पुरस्काराबद्दल सोजाई आदिवासी महिला विकास फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत चव्हाण ,उपाध्यक्ष डॉ ओंकार चव्हाण, खजिनदार द्रौपदी सोनवणे, संस्थेचे सदस्य दत्तात्रय चव्हाण, लताताई चव्हाण, संगीता बोरुडे,, दैनिक माझा मराठवाडा चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे

## पुरुष गटात श्री. सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळ तर महिला गटात शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळ ठरले मानकरी

**पान १ वरून** त्या अनुषंगाने भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी या भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात ही स्पर्धा रंगली. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरलेल्या विजेत्या मंडळाला प्रत्येकी ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला २५ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक ७ हजार रुपये, तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी ७ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून पंडित शंकरराव वैरागकर, बंडाराज घाडगे, नंदकुमार पाटील यांनी काम पाहिले. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी पुरुष गटातून ३६ तर महिला गटातून ३० भजन मंडळांनी सहभाग घेतला होता. त्यामधून पुरुष गटातील अंतिम फेरीसाठी श्री सद्‌गुरू वामनबाबा प्रासादिक भजन मंडळ सिद्धी करवले, श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ खारघर, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वलप, श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ गव्हाण, सुरताल भजन मंडळ नारंगी, जय श्री राधे गोविंद भक्ती समूह कामोठे, शारदा संगीत भजन मंडळ विचुंबे, स्वरविहार भजन मंडळ अलिबाग, श्री स्वामी समर्थ भजन मंडळ अंजप, श्री सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळ म्हसळा, श्रीराम वरदायिनी भजनी मंडळ उलवे, श्री सिद्धेश्वर प्रासादिक संगीत भजन मंडळ आवास, श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ वावंजे, गावदेवी प्रासादिक भजन मंडळ पेंधर, श्री गंगादेवी भजन मंडळ अलिबाग तर महिला गटात श्री पांडुरंग प्रासादिक भजन मंडळ खारघर गाव, आई एकविरा महिला भजन मंडळ दुन्द्रेपाडा, कुलस्वामिनी प्रासादिक भजन मंडळ ओवेपेठ, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वाजे, श्री सद्‌गुरू कृपा प्रासादिक महिला भजन मंडळ चिंचवली, कै. वैजयंती माता भजन मंडळ सावळे, सिद्धेश्वर प्रासादिक भजन मंडळ तळोजे मजकूर, श्री विश्वविजयनाथ सुहास्य संगीत विद्यालय उरण, ओमसाई भजन मंडळ खरसुंडी, नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा, शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळ कर्जत, श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळ नेरळ, जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ खोपोली, राधाकृष्ण प्रासादिक भजन मंडळ वावंजे, आणि ओंकार संगीत भजन मंडळ नेरळ या भजन मंडळांची निवड झाली होती. दोन दिवस चाललेल्या या भजन स्पर्धेत भजन मंडळांनी आपली कला सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या भजन स्पर्धेच्या आयोजनामुळे भजन मंडळ व कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले.

## चिमुकल्यांच्या जीवाशी चालणारा खेळ कधी थांबणार?

### ती दोरीवरून चालताना अचानक पडली अन् .

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार (प्रतिनिधी)**



दोरीवरून चालताना अचानक चिमुकलीचा आलेल्या वाऱ्यामुळे तोल गेला खाली असलेला तिचा बाप तिला झेलण्यास तयार होतात परंतु तिच्या हातातील बांबू त्याच्या डोक्यात पडल्याने ती डायरेक्ट जमिनीवर आदळली आणि बघायला कधी नव्हे ते दया आली. यावेळी अशा चिमुकल्यांच्या जीवाशी चालणारा खेळ कधी थांबणार? हा प्रश्न उपस्थित होतो.

शहरापासून खेड्यापर्यंत गल्लोगल्ली, रस्त्यावर, गर्दीच्या ठिकाणी; आई वडील संगीत वाजवून चिमुकलीला दोरीवर चालवण्याचा कार्यक्रम करत असतात. असाच कार्यक्रम आज शिरूर शहरात सकाळपासून अनेक ठिकाणी झाला. परंतु दुपारी गोमळवाडा चौकात हा कार्यक्रम चालू असताना एक अनपेक्षित घटना घडली. ती चिमुकली दोरीवरून चालत असताना अचानक वारा आला. कदाचित ती दोरी बांधताना व्यवस्थित बांधली नसेल किंवा व्यवस्थित बांधली असली तरीही वाऱ्यामुळे तोल जाणे सहाजिक आहे. तिचा तोल गेला ती कोसळली खाली उभा असलेला तिचा बाप तिला झेलायला तयार होता. परंतु तिच्या हातातील बांबू त्याच्या डोक्यात लागल्यामुळे नको ती घटना घडली. इतक्या उंचीवरून पडल्यामुळे नंतर तिला उठवले, पाणी पाजले, ती भांबारल्यासारखी होती. एरवी असा कधीही खेळ चालू असताना खेळ पाहायचा आणि दमडीही न देता निघून जायचे, असे करणारे आज चक्क त्यांच्याभोवती गर्दी करू लागले. त्यांना विविध प्रकारचे सल्ले देऊ लागले. परंतु खेळ न करावा तर खाऊ काय हा त्यांचा प्रश्न अनुत्तरीत आहे.

अशा कळ्यांच्या शिक्षणाचे काय?
मुलगी चार-पाच वर्षाची होताच तिला शाळेत घालण्या ऐवजी दोरीवर चालवणे शिकवले जाते. त्यांचे आई-वडील अशाच चिमुकलीच्या जीवावर स्वतःचा संसार चालवतात हे सत्य आहे. या कोमलणाऱ्या कळ्यांना शिक्षण का मिळू नये?

**हा खेळ थांबलाच पाहिजे**

हा खेळ थांबवायचा असेल तर अगोदर या चिमुकल्यांच्या आई-वडिलांचा पोटा पाण्याचा प्रश्न सोडवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्थांनी अशा मुलींच्या आई-वडिलांना रोजगार उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्याशिवाय असे लोक आपल्या मुलीच्या शिक्षणाचा विचार करणार नाहीत. या समाजात चाललेले हे चक्र कुणीतरी तोडलेच पाहिजे त्यासाठी सरकारनेही काहीतरी ठोस पावले उचलले गरजेचे आहे.

## खा. अनुप धोत्रे यांच्याकडून सततच्या पावसामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानासाठी शासनाकडून लवकरच मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार

**दैनिक युवक आधार**
**रणजीत सिंह ठाकुर**

रिसोड : ढगफुटी सदृश पावसामुळे जिल्ह्यात शेत जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परिणामी रिसोड, मालेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी उभ्या पिकांसह खरडून गेल्या आहेत. सदर नुकसानग्रस्त भागाची खा. अनुप धोत्रे यांनी काल दि. 23 रोजी पाहणी केली. झालेले नुकसान पाहता, शासनाकडून लवकरात लवकर मदत मिळवून देण्यासाठी आपण सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे खा. धोत्रे यांनी म्हटले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. काल दि. 23 आगष्ट शनिवारी अकोला लोकसभा मतदार संघाचे शेतकरी खा. अनुप धोत्रे यांनी रिसोड, मालेगाव तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत रिसोड-मालेगाव विधानसभा मतदार संघाचे प्रचारप्रमुख ऍड. नुकल देशमुख यांची उपस्थिती होती. दरम्यान, खा. धोत्रे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या विविध समस्या जाणून घेतल्या. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे, पाचंबा, गणेशपूर,पिंपरखेड, बाळखेड, महागाव आदी गावातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान खा. धोत्रे यांनी प्रत्यक्ष पहिले आहे. सदर नुकसान पाहता शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत मिळणे अत्यावशक असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्या अनुषंगाने आपण सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहोत असे म्हटले आहे. यावेळी उपस्थित असलेले महसूल व कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश खा. अनुप धोत्रे यांनी दिले आहेत. त्यांच्या या दौऱ्यात भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.खा. अनुप धोत्रे यांच्याकडून सततच्या पावसामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानासाठी शासनाकडून लवकरच मदत मिळवून देण्यासाठी



प्रयत्न करणार तालुका प्रतिनिधी रणजीत सिंह ठाकुर रिसोड : ढगफुटी सदृश पावसामुळे जिल्ह्यात शेत जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परिणामी रिसोड, मालेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी उभ्या पिकांसह खरडून गेल्या आहेत. सदर नुकसानग्रस्त भागाची खा. अनुप धोत्रे यांनी काल दि. 23 रोजी पाहणी केली. झालेले नुकसान पाहता, शासनाकडून लवकरात लवकर मदत मिळवून देण्यासाठी आपण सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे खा. धोत्रे यांनी म्हटले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. काल दि. 23 आगष्ट शनिवारी अकोला लोकसभा मतदार संघाचे शेतकरी खा. अनुप धोत्रे यांनी रिसोड, मालेगाव तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत रिसोड-मालेगाव विधानसभा मतदार संघाचे प्रचारप्रमुख ऍड. नुकल देशमुख यांची उपस्थिती होती. दरम्यान, खा. धोत्रे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या विविध समस्या जाणून घेतल्या. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे, पाचंबा, गणेशपूर,पिंपरखेड, बाळखेड, महागाव आदी गावातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान खा. धोत्रे यांनी प्रत्यक्ष पहिले आहे. सदर नुकसान पाहता शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत मिळणे अत्यावशक असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्या अनुषंगाने आपण सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहोत असे म्हटले आहे. यावेळी उपस्थित असलेले

# रमेश दादा आजबे तुम्ही आष्टी तालुक्यातील शेतकरी व ग्राहकांची मने जिंकली!

## ट्रॅक्टर विक्रीचा हंगाम असो की नसो,सावळेश्वर ट्रॅक्टर सुसाट

## ६ महिन्यात सावळेश्वर ट्रॅक्टर च्या स्वराज ट्रॅक्टर ची २०५ ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री

## आष्टीकरांचा सावळेश्वर ट्रॅक्टर्स वरचा विश्वास वाढला ग्राहकांची पसंती

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

प्रत्येक व्यवसाचा विशिष्ट कालावधी असतो ग्राहकांची ही हंगाम असले तर खरेदीसाठी जास्त ओढ असतो.परंतु याला अपवाद आहे.सावळेश्वर ट्रॅक्टर्स चे सर्वेसर्वा रमेश दादा आजबे यांनी आष्टी तालुकावासीयांना दिलेली सेवा आणि जिकलेली मने त्यांच्या सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नुतन शोरुमचे उद्घाटन आष्टी शहरात १९ फेब्रुवारी २०२५ शिवजयंतीच्या शुभमुहूर्तावर स्वराज ट्रॅक्टर चे भव्य शोरूमचे उद्घाटन आष्टी शहरात धोंडे पेट्रोल पंपाच्या समोर संपन्न झाले होते. उद्घाटनावेळी १९ ट्रॅक्टर वितरित करून उद्घाटन केले होते. अन अवघ्या ६ महिन्यात २०५ ट्रॅक्टर विक्रीचा विक्रमी पल्ला गाठला आहे.नुकतीच ६ महिन्यांची ट्रॅक्टर विक्रीची आकडेवारी सर्वेसर्वा रमेश आजबे यांनी जाहीर केला आहे.त्यानुसार आगामी काळात त्यांचा चांगली सुसाट ग्रोथ होणार असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. मार्केट मध्ये अनेक ट्रॅक्टर शोरुम आहेत.परंतु सावळेश्वर ट्रॅक्टर्स ने बाजारात आपले स्थान अधिकच मजबूत केले आहे.त्यांनी ग्राहकांच्या अडचणी सोडून मदत करत दिलेली सेवा व ग्राहकांची मने जिंकली यामुळे सावळेश्वर ट्रॅक्टर्स वरचा ग्राहकांचा विश्वास वाढला असुन ट्रॅक्टर खरेदीसाठी ग्राहक सावळेश्वरच्या स्वराज ट्रॅक्टर ला मोठ्या प्रमाणावर पसंती दर्शवत आहेत.आष्टी तालुक्यातील ग्राहकांनी दिलेले समर्थन व दाखवलेल्या विश्वासासाठी महत्वाच्या कामगिरी बद्दल ग्राहकांचे, शेतकऱ्यांचे,तसेच सावळेश्वर ट्रॅक्टर्स टीमचे आभार सावळेश्वर ट्रॅक्टर्स चे सर्वेसर्वा रमेश दादा आजबे यांनी मानले आहेत. सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जिवनामध्ये परिवर्तन घडवून आणणे आणि त्यांचे जिवन समृद्ध करणे या उद्देशाने प्रेरित होऊन ट्रॅक्टर उद्योग जगतात २०१६ पासून पाऊल ठेवले त्यांनी आष्टी




शहरात १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती च्या शुभमुहूर्तावर सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावाने स्वराज ट्रॅक्टर चे नवीन ट्रॅक्टर शोरुमचा भव्य शुभारंभ संपन्न झाला यावेळी भव्य बंफर ऑफर ठेवल्याने तात्काळ बुकींग करणा-यास सवलत देण्यात आल्याने अवघ्या ६ महिन्यात २०५ स्वराज ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री झाली आहे.दणगट व कमी खर्चात ज्यादा काम करणाऱ्या स्वराज ट्रॅक्टने आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना भुरळ घातली आहे.हा विक्रमी सेलचा टप्पा ओलांडण्यासाठी संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांच्या सह स्टेट हेड गुप्ता साहेब, एरिया मॅनेजर गिरीश जाधव, टेरेटरी मॅनेजर चेतन मुंडे साहेब ब्रांच मॅनेजर मुळे साहेब मॅनेजर प्रकाश कदम, मॅनेजर राजू साबळे,अकाउंट प्रांजली उगले,सुजाता सायकड,रेणुका वैद्य, सर्विस मॅनेजर रंजीत मुंडे आप्पासाहेब गायकवाड, सेल्स टीम मध्ये आकाश शेळके, लखन आजबे,सागर निकरड,जालिंदर भवर,गीते, खंडागळे,गायकवाड, सर्विस टीम मध्ये हनुमान घरगणे, आकाश पवार,कृष्णा भवर, इब्राहिम पठाण, रवींद्र खंडागळे, नामदेव हराळ, ओमकार सोले,स्वप्नील बरकडे, ,कुमार विश्वकर्मा आदींच्या अथक परिश्रमाने ग्राहकांना जलद सेवा दिल्याने विक्रमी विक्रीचा टप्पा पार केला आहे.

**ग्राहक राजा,मित्र परिवार, आप्तेष्ट नातेवाईक,**
**शेतकरी बांधव व आष्टीकरांचे मनापासून आभार**

सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावावरती व स्वराज ट्रॅक्टर्स वर ग्राहकांनी आष्टी तालुक्यातील नागरीकांनी प्रचंड विश्वास दाखवला असून शेतीमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या आणि बळीराजाचे जिवन समृद्ध करण्याच्या उद्देशाने प्रेरित होऊन आम्ही सुरू केलेल्या सावळेश्वर ट्रॅक्टर्स स्वराज ट्रॅक्टर चे अधिकृत डिलर ने ६ महिन्यात २०५ ट्रॅक्टर विक्रीचा विक्रमी टप्पा पार केला आहे.आपल्या सर्वांच्याच विश्वासास पात्र राहून सेल्स,सर्विस,स्पेअर साठी लक्ष देऊ, तुमच्या प्रगतीसाठी सावळेश्वर ट्रॅक्टर्स नेहमीच कटीबद्ध आहे. आमच्या ग्राहकांना, शेतकऱ्यांना,आम्हाला दररोज प्रेरणा देणा-या प्रत्येकाला, तसेच आमच्या भागीदारांना आणि आमच्या टीमला आपण सर्वच एकत्र परिवर्तनाच्या प्रवासात करत असताना मनापासून आभार मानू इच्छितो

**- रमेश दादा आजबे ( सर्वेसर्वा सावळेश्वर ट्रॅक्टर्स )**

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# शिक्षकदिनाच्या पूर्वसंध्येला जनजागृती सेवा संस्थेतर्फे जि.प.पूर्ण प्राथमिक शाळा गवाणे येथील शिक्षकांचा सन्मान सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**-देवगड प्रतिनिधी -गुरुनाथ तिरपणकर**

शिक्षक दिनानिमित्त जनजागृती संस्थेतर्फे दरवर्षी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून सन्मान सोहळा आयोजित करण्यात येतो, यावर्षी 5 सप्टेंबर शिक्षक दिन हा गणेशोत्सवामध्ये येत असल्यामुळे आणि शाळेला सुट्टी असल्याकारणाने हा सन्मान सोहळा देवगड तालुक्यातील गव्हाणे या ग्रामीण भागातील शाळेत शालेय कामकाजाच्या शेवटच्या दिवशी शाळेमध्ये आयोजित करण्यात आला.



यावेळी जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरुनाथ मधुसूदन तिरपणकर , आणि संस्थेचे मार्गदर्शक जेष्ठ सल्लागार राष्ट्रपती शौर्य पुरस्कार प्राप्त दिलीप शाहू नारकर,निसर्गमित्र, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रख्यात चित्रकार अक्षय मेस्त्री यांनी शाळेत येऊन शाळेतील कार्यरत मुख्याध्यापक अमरीन जावेद शेख तसेच शिक्षकवृंद,लक्ष्मण भागा घोटकर, सद्गुरू ज्ञानेश्वर तळेकर, अंगणवाडीत अध्यापनाचे कार्य करणाऱ्या कुमुदिनी कमलाकर अधिकारी देसाई,अंगणवाडी मदतनीस विजया चव्हाण आदींचा सन्मानपत्र आणि भेटवस्तू देऊन सन्मान केला.

"चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडवून, या स्पर्धेच्या युगात त्यांना बौद्धिकस्पर्धा करायला लावून देशासाठी आदर्श नागरिक फक्त शाळेतच घडवण्याचे काम शिक्षक करत असतात." असे गौरवात्मक उद्गार, जनजागृती सेवा संस्था(रजि.)बदलापूर,जि. ठाणे,मा.संस्थापक अध्यक्ष-श्री. गुरुनाथ तिरपणकर,साहेब यांनी जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा गवाणे, ता.देवगड,जि. सिंधुदुर्ग येथे 5सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधत शाळेतील सर्व शिक्षक आणि बालवाटीका सेविका यांचा सन्मानपत्र आणि भेट वस्तू देऊन सन्मानित करतांना आणि शुभेच्छापर संदेश देतांना काढले.

यावेळी माजी कमांडींग ऑफीसर 'ई' परिमंडळ बृहन्मुंबई,समता साहित्य परिषद महाराष्ट्राचे अध्यक्ष, राष्ट्रपती पदक सन्मानित आदरणीय श्री. दिलीप नारकर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत ग्रामीण भागातील विद्यार्थीही अधिकारी होऊ शकतो हे सांगत असताना, जन्मभूमी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील फणसगाव असले तरी, शालेय जीवन ते शिपायाच्या नोकरीपासून एक आय.पी.एस्. अधिकारी बनून भारताच्या मा. राष्ट्रपती यांचेकडून सन्मानीत झालेले श्री. दिलीप नारकर साहेब म्हणाले,"विद्यार्थी दशेत असतांना जर अभ्यास,संस्कार,शिस्त चारित्र्यसंपन्नता मिळवायची असेल आणि यासाठी जर शिक्षकांनी आपल्याला थोड्याफार प्रमाणात शिक्षा केली तर विद्यार्थ्यांनी ती सहन करण्याची क्षमता ठेवली पाहिजे. "मी वर्गातील सर्वांत जास्त मार खाल्लेला विद्यार्थी आहे आणि ते सहन केले म्हणून आय.पि.एस. अधिकारी होऊन सेवानिवृत्त झालो." "आज जनजागृती संस्थेचे श्री. तिरपणकर साहेब यांच्याबरोबर काम करत आहे. गवाणे गावाबद्दल मला खूप आदर आहे आणि या गावातील शाळेचे शिक्षक खरोखर कष्टाळू, प्रामाणिक,बौद्धिकतेने संपन्न असे आहेत. त्यांनी मागील वर्षी अनेक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन,अनेक स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांना संधी देऊन शाळेचे वातावरण हे उपक्रमशील व स्पर्धात्मक बनवले आहे हे येथे आल्यावर समजते."

त्यांनी सर्व शिक्षक, बालवाटीका सेविका यांना 5 सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

त्यांच्या शालेय शिक्षण ते सेवानिवृत्तीप्र्यांच्या प्रवासातून विद्यार्थ्यांना एक नवी प्रेरणा मिळाली.गवाणे सारख्या ग्रामीण विभागातील जि.प.शाळेतील शिक्षकांचा सन्मान करण्याची संधी मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सद्गुरू तळेकर तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका श्रीमती. अमरीन शेख यांनी केले.

# जामखेड येथुन श्री नागनाथ यात्रा कंपनी कडून शिक्षिकांची भंडारदरा स्पेशल ट्रीप

**बीड आष्टी प्रतिनिधी**
**मारुती सत्रे जामखेड (प्रतिनिधी)**

राजश्रीताई दळवी:जामखेड येथुन श्री नागनाथ यात्रा कंपनी हिरडगाव श्री दत्तात्रेय साळुंके महाराज,श्री राम साळुंके,श्री अनिल साळुंके व सौ राजश्री भारत दळवी यांनी भंडारदरा ट्रीप चे आयोजन केले व दि.31/8/2025 या रात्री भंडारदरा ट्रीप भंडारदरा ट्रीप जामखेड येथुन सर्व शिक्षिकांची स्पेशल ट्रीप काढण्यात आली जामखेड येथील महिलांनी येथील महिलांनी भंडारदरा येथे खूप एन्जॉय करून सुखरूप परत आले आहेत मी सौ राजश्री भारत दळवी सर्व महिला शिक्षकांचे मनापासून खूप खूप आभार मानते यापुढे पण अशीच साथ द्या विशेष करून मला कदम मॅडम चे खूप मदत झाली



राजश्रीताई दळवी,श्रीमती निशा मधुकर कदम,मृण्मयी सूर्यकांत कदम,श्रीमती सुमन बाबासाहेब खेडकर ,ताराबाई दत्तात्रय यादव,सृष्टी दत्तात्रय यादव,झोरे सोनाली राजाराम,कानडे मंजुषा हरिभाऊ,अर्चना विष्णू भोसले,प्रतिभा दत्तात्रय ढोबळे,कल्पना जालिंदर ससाने,कालींदा मारुती म्हेत्रे,कल्पना रंगनाथ साबळे,सरिता सुभाष कवडे,राणी ज्ञानदेव वराडे,कल्पना विश्वंभर मोरे,ईश्वरी बबन यादव,वंदना विठ्ठल मोरे,रेखा नितीन साळे,कल्पना संतोष राऊत,राजश्रीताई दळवी: मी सौ राजश्री भारत दळवी आमच्या श्री नागनाथ यात्रा कंपनी कडून सर्वांचे पुन्हा एकदा मनापासून आभार मानते चालक-मालक श्री बाबा महाराज मुरुमकर यांनी खूप छान गाडी चालवली. बाई पण भारी

# मुंबई गोवा हायवेवरील खड्ड्यावर झी 24 तास वर प्रसारित झालेल्या गाण्याला कोकणकरांचा उदंड प्रतिसाद




**दैनिक युवक आधार**
**मुंबईः- (प्रमोद तरळ)**

कलाप्रेमी कोकण ग्रुपच्या माध्यमातून मुंबई गोवा महामार्गावर पडलेल्या खड्ड्यावर लिहिलेल्या " जिकडे तिकडे चहूकडे या हायवेवर खड्डे पडले, गणराया मी येऊ रे कसे" हे गाणे नुकतेच व्हायरल झाले आणि दि. २४ ऑगस्ट रोजी या ग्रुपला झी 24 तास स्टुडिओत जाण्याची संधी मिळाली येथून या गाण्याचे लाईव्ह प्रक्षेपण दाखवले गेले या व्हायरल गाण्याला कोकणवासीयांनी भरभरून प्रतिसाद दिला

या व्हायरल गाण्याच्या टीमला झी 24 तास स्टुडिओत जाण्याची संधी मिळाली यावेळी मुख्य गायक सच्चिदानंद हांदे,ढोलकी यश केळकर, कोरस - विराज चव्हाण, विक्रांत नलावडे,रोशन मोरे, संकेत कदम,वैभव हांदे, कैवल्य राणे आदी टीम उपस्थित होती.

# भविष्यात येणाऱ्या सर्व शैक्षणिक अडचणींमधे शिवसेना ( उबाठा ) पक्ष विद्यार्थ्यांच्या सोबत उभी राहील - शिवसेना उपनेते बबनदादा पाटील

**दैनिक युवक आधार**
**पनवेल दि. २५ ( वार्ताहर )**

: भविष्यात येणाऱ्या सर्व शैक्षणिक अडचणींमधे शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्ष विद्यार्थ्यांच्या सोबत उभी राहील असे प्रतिपादन शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांनी पनवेल विधानसभेतील पाली देवद शाखेत उपविभाग प्रमुख जयंत पाखरे, शिवसेना शाखा प्रमुख माने यांच्या माध्यमातून दहावी बारावी मधील गुणवंत विद्यार्थी आणि वीज वितरण कंपनीतील कार्यतत्पर योद्ध्यांचा सत्कार करताना केले. यावेळी शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, मा. नगरसेवक अतुल पलन, युवासेना जिल्हा अधिकारी पराग मोहिते, विधानसभा अधिकारी अजय पाटील, पाली देवद शाखेत उपविभाग प्रमुख जयंत पाखरे, शिवसेना शाखा प्रमुख माने आदी पदाधिकारी उपस्थित होते. शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांनी आपल्या भाषणात




शिवसेना उपनेते बबनदादा पाटील विद्यार्थ्यांचा सत्कार करताना

विद्यार्थ्यांना सांगितले की भविष्यात येणाऱ्या सर्व शैक्षणिक अडचणींमधे शिवसेना त्यांच्या सोबत उभी राहील आणि त्यांच्या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्वोतोपरी मदत करण्यात येईल. यावेळी परिसरातील विद्यार्थ्यांचा व वीज वितरण कंपनीतील कार्यतत्पर योद्ध्यांचा सत्कार करण्यात आला .

# डॉ. निकेत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त समाज उपयोगी विविध कार्यक्रम

## भाजप खोपोली शहर मंडळाच्या हस्ते फळ वाटप

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वार्ताहर**

जेष्ठ समाजसेवक अनंत पाटील यांच्या लोक सेवेचा वारसा पुढे चालवणारे युवा मोर्चा खोपोली शहर मंडल अध्यक्ष डॉ.निकेत पाटील यांचा 25 ऑगस्ट रोजी वाढदिवस हि सेवाकार्य दिन म्हणून विविध समाज उपयोगी कार्य करून साजरा करण्यात आला . लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आमदार प्रशांत दादा ठाकूर यांच्या आदेशा नुसार व प्रेरणेने हा स्तुत्य उपक्रम साजरा करताना रुग्णांना फळ वाटपाचा एका छोटा खानी कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय खोपोली येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी सर्व भाजप जिल्हा व शहर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी डॉ. निकेत पाटील यांना शुभ आशीर्वाद देत शुभेच्छा दिल्या .





पाटोदाः- भामेश्वर विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक एल.आर. जाधव सर यांचे चिरंजीव डॉ.प्रशांत जाधव यांच्या शुभ विवाह प्रसंगी जामखेड येथे उपस्थित राहून शुभेच्छा देताना. आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, पाटोदा नगर पंचायतचे नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अभिषेक जाधव यांच्या सह इतर मान्यवर...
(छाया- दैनिक युवक आधार पाटोदा.)

# खेळीमेळीच्या वातावरणात खोपोली मस्जिद ट्रस्ट निवडणूक २०२५ संपन्न ; चांदतारा पॅनल विजयी

## निकाला अंती दोन्ही पॅनल च्या उमेदवारांनी एकमेकांना आलिंगन देत शुभेच्छा दिल्या

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**

खोपोली मुख्य बाजर पेठेतील खोपोली मस्जिद ट्रस्ट ची निवडणूक ( २०२५ )२४ ऑगस्ट रोजी खोपोली मुस्लिम काम्युनिटी हॉल येथे संपन्न झाली असून त्यात एकूण १४ उमेदवार रिंगणात होते . यातील ०७ उमेदवारांची चांद तारा हि एकच निशाणी असून उर्वरित प्रत्येक एक उमेदवाराची गुबंद, तराजू, नारळाचे झाड, थापी, ऑटो रिक्षा, हातोडी, गुलाब असे स्वतंत्र निवडणूक चिन्ह होते. यावेळी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अधिकारी खुसरो खान व अब्दुल जब्बार शेख यांनी अँड .इब्राहिम भुसारी निवडणूक अधिकारी यांच्या उपस्थितीत मतमोजणी अंती चांद तारा पॅनलचे सर्व सात





सदस्य उमेदवार मताधिक्याने विजयी झाल्याचे घोषित केले. यात निवडणूकित विजयी सदस्य अतिक खोत, रहीम सोरटिया, अबू जळगावकर ,अनवर खोत,फझल सय्यद, रशीद शेख,हरून शेख यांना खोपोली मस्जिद ट्रस्ट निवडणूकित यश मिळाले यावेळी अन्य उमेदवारांनी एकमेकांना शुभेच्छा देत हि निवडणूक शांततेत पार पाडली. खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या नेतृत्वाखाली या ठिकाणी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मुस्लिम बांधवांनी खेळीमेळीच्या वातावरणात मतदान प्रक्रियेत सहभाग घेत आदर्श निवडणूक म्हणून उदाहरण देण्यात यशस्वी ठरले.

# रेवदंड्यात गणेशोत्सवाच्या खरेदीला उधाण ; परंपरा, आधुनिकता व पर्यावरणपूरकतेचा संगम

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून रेवदंड्यासह अलिबाग, रोहा आणि पेण या आसपासच्या बाजारपेठांमध्ये खरेदीला उधाण आले आहे. श्रद्धा, परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवत बाजारपेठा झगमगल्या आहेत.



फुलांची आरास, मूर्तींच्या सजावटीचे साहित्य, रोषणाईच्या माळा, विद्युत दिवे, कंदील, विविध प्रकारची मखरे आणि सजावटीच्या वस्तूंनी बाजारपेठा बहरल्या आहेत. विशेष म्हणजे यंदा ग्राहकांची पसंती पर्यावरणपूरक सजावटीकडे जास्त असल्याचे स्पष्ट जाणवत आहे. कागद, बांबू व लगद्यापासून तयार केलेली फोल्डेबल मखरे, तसेच घरगुती गणेशासाठी मिनी मखर ही नवीन संकल्पना लोकप्रिय ठरत आहे.

पावसाळ्याचा हंगाम लक्षात घेऊन वॉटरप्रूफ सजावटीचे साहित्य, तसेच एलईडी लाइट्सचा झगमगाट ग्राहकांना आकर्षित करत आहे. रेवदंडा, अलिबाग, पेण व रोहा बाजारपेठेत संकल्पनेवर आधारित मखरे, शिवकालीन किल्ले, अयोध्येतील राममंदिर व देवदेवतांचे कटआउट्स सजवलेले मखर ग्राहकांना भावत आहेत.लघुउद्योजकांना रोजगाराची संधी गणेशोत्सव हा केवळ भक्तीचा उत्सव नसून लघुउद्योजकांसाठी रोजगाराचाही मोठा हंगाम ठरतो. मूर्तिकार, डेकोरेटर्स, मखर निर्माते, इलेक्ट्रिक सामान विक्रेते, फुले आणि मिठाई व्यावसायिक यांच्यासाठी ही वेळ वर्षभराच्या धंद्याची संधी ठरते.स्थानिक विक्रेते सांगतात की, “दोन महिन्यांच्या विक्रीत वर्षभराचा धंदा उभा राहतो. ग्राहकांकडून यंदा उत्तम प्रतिसाद मिळतो आहे.”"मिठाईत ‘हेल्दी’ ट्रेंड"मोदक, पेढे, लाडू यांसोबत यंदा शुगर-फ्री व मिलेटपासून बनवलेले मोदक विक्रीस आल्याने ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आरोग्याचा विचार करणाऱ्या भक्तांसाठी हा ट्रेंड लोकप्रिय ठरत आहे.*रोषणाईचा झगमगाट*

कंदील, एलईडी स्ट्रिप लाइट्स, फ्लॅशिंग सिरीज, प्रोजेक्शन लाइट्स यांच्या विक्रीत तब्बल २५ टक्क्यांची वाढ झाल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. संध्याकाळी रेवदंड्यासह अलिबाग, पेण व रोहा बाजारपेठांतील स्टॉल्स झगमगत असून गणेशभक्त मंत्रमुग्ध होत आहेत.*संस्कृती व तंत्रज्ञानाचा मिलाफ*‘गगनचुंबी मुंबई’ सारख्या आधुनिक संकल्पनांवर आधारित मखरे, तसेच इतिहास व विज्ञान-तंत्रज्ञानाची सांगड घालून तयार केलेली सजावट ग्राहकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. श्रद्धा, संस्कृती, आधुनिकता आणि पर्यावरणपूरकता यांचा संगम यंदा बाजारपेठेत ठळकपणे जाणवत आहे.*कोकणभरात गणेशोत्सवाची लगबग*

रेवदंड्यासह अलिबाग, रोहा, पेण बाजारपेठा झगमगत असल्या तरी हा उत्साह केवळ इथवरच मर्यादित नाही. संपूर्ण कोकणात सध्या गणेशोत्सवाची लगबग सुरु असून श्रद्धा, परंपरा, आधुनिकता आणि पर्यावरणपूरकतेचा संगम साधत कोकणातला बाप्पा उत्सव अधिक रंगतदार ठरत आहे.

# मंगरुळपीर येथे सद्भावना दिन आणि युवा पॉलिसी स्टँडअप इंडिया संदर्भात मार्गदर्शनv कार्यक्रम




**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी –रणजीत सिंह ठाकुर**

मंगरुळपीर येथे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त सद्भावना दिनाचे औचित्य साधून "युवा पॉलिसी व स्टँडअप इंडिया" my bharat " प्रोटल रजिस्ट्रेशन या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम वसंतराव नाईक व अमर्सिंग नाईक कला वाणिज्य आर्ट कॉलेज मंगरुळपीर येथे "मेरा युवा भारत केंद्र" व "नेहरू युवा मंडळ, केकतउमरा" यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. कार्यक्रमात युवकांमध्ये सद्भावना, सामाजिक ऐक्य व स्वावलंबनाचे मूल्य रूजवण्यावर भर देण्यात आला. तसेच भारत सरकारच्या युवा धोरण व स्टँडअप इंडिया योजनेच्या माध्यमातून युवकांना रोजगाराच्या संधी, उद्योजकता व आर्थिक स्वावलंबनाकडे प्रोत्साहित माय भारत रजिस्ट्रेशन नोंदणी संदर्भात करण्याचे उद्दिष्ट कार्यक्रमाचे प्रमुख्य मार्गदर्शक प्रदिप पट्टेबहादूर यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. डॉ वादगुल्ले, प्रमुख्य उपस्थित राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.पि.आर. तायडे, क्रीडा मार्गदर्शक प्रा. ढाकूरकर, स्वयंसेवक दत्ता मोहळे यांची उपस्थिती होती. या सूत्रसंचालन प्रा. ढाकूरकर यांनी केले. तर सर्वांचे आभार वैष्णवी पवार यांनी मानले. उपस्थित सर्वांना सद्भावना शपथ देण्यात आली, सदर कार्यक्रम जिल्हा युवा अधिकारी सारंग मेश्राम, अनिल ढेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

# शेतकऱ्याची व्यथा – शेतात घाम, डोळ्यात अश्रू, हृदयात वेदना

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सुर्यकार**

"सकाळी उठून बैलाला जुंपलं, शेतात जाऊन पेरणी केली, पिकं उगवली खरी पण आकाशातल्या ढगांनी साथ दिली नाही. पाऊस आला, पण थोडा थोडका. कधी आला तर झोडपून गेला, कधी थांबला तर आठवड्याभर थांबून गेला. उगवलेलं पीक कोमेजलं, काही ठिकाणी बुडालं. माझं सगळं कष्टाचं श्रम वाया गेलं."



हे शब्द आहेत धर्माबाद तालुक्यातील एका शेतकऱ्याचे. त्याच्या डोळ्यात अश्रू तर आहेतच, पण मनात मोठं ओझं दडलेलं आहे.

**पिकं नष्ट झाली, पण कर्ज माफ झालं नाही.**

खतं, औषधं, बियाणं महाग; पण मालाला बाजारभाव मात्र तोच जुना.

घरखर्च, लेकरांचं शिक्षण, आई–बाबांचे औषधोपचार या सर्व गोष्टींसाठी पैशांची चणचण.

**शेतकरी सांगतो –**

"रात्री झोप लागत नाही, विचारांनी डोकं फुटायला होतं. लेकराच्या शिक्षणासाठी द्यायचे पैसे हातात नाहीत, बायकोच्या डोळ्यांतले प्रश्न मी कसे उत्तरू? पिकाला भाव नाही, कर्ज फेडायचंय, उद्या काय होईल हेच कळत नाही"

ही व्यथा फक्त एका शेतकऱ्याची नाही, तर हजारो–लाखो बळीराजांची आहे. कष्टाच्या घामाने भूमीला ओलाचिंब करणारा शेतकरीच उपाशी राहतोय, ही खरी शोकांतिका आहे.

**:बाजारभाव नाही, कष्ट वाया:**

धान्य, कापूस, सोयाबीन यांना बाजारात योग्य भाव मिळत नाही. शेतकरी रात्रंदिवस कष्ट करूनही माल व्यापाऱ्यांच्या दारात कौड्याच्या किंमतीत विकावा लागतो. "कष्ट आमचे, नफा दुसऱ्यांचा" अशी शेतकऱ्यांची व्यथा आहे.

**:कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी:**

पेरणीसाठी घेतलेले कर्ज अजून फेडायचे, त्यात नव्या हंगामाची तयारीसाठी पुन्हा उचल. बँकांचे हप्ते, सावकारांचा तगादा आणि घरखर्च यामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे.

**:घरात उपास, लेकरांच्या शिक्षणावर गंडांतर:**

पिकं वाचली नाहीत म्हणून घरखर्च भागवता येत नाही. लेकरांचं शाळा–कॉलेजचं फी देणं कठीण झालं आहे. औषधोपचार व इतर खर्च कसा भागवायचा हा प्रश्न डोक्यावर आहे. "शेतातल्या मातीत सुख शोधलं, पण लेकरांना दुःख दिलं" अशी भावना शेतकरी व्यक्त करतो.

**:कष्ट करूनही उपाशी – शेतकऱ्याची शोकांतिका:**

शेतातल्या मातीत घाम ओतूनही घरात उपाशीपोटी दिवस काढावे लागत आहेत. जनावरांना चारापाणी मिळत नाही, घरच्यांच्या नजरा पाहून शेतकऱ्याच्या डोळ्यात अश्रू येतात. ही वेदना फक्त शेतकऱ्याची नाही, तर संपूर्ण ग्रामीण समाजाची आहे.

**:सरकारच्या मदतीच्या प्रतीक्षेत बळीराजा:**

शेतकरी संघटनांनी तातडीने कर्जमाफी, हमीभाव, वीजदर कपात आणि खतांवर अनुदान द्यावे, अशी मागणी केली आहे. मात्र तोपर्यंत बळीराजाच्या डोळ्यांत एकच प्रश्न – "आमचं भविष्य कोण वाचवणार?"

# दिल्ली येथे रायगड जिल्ह्यातील दोघांना महारक्तवीर आणि दोघांना रक्तविर पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलनच्या वतीने दिल्ली येथील पंचतारांकित हॉटेल अशोका मध्ये 19 ऑगस्ट 2025 रोजी 100 पेक्षा अधिक रक्तदान करणाऱ्या एकुण 15 रक्तदात्याचा महारक्तविर व 50 पेक्षा अधिक रक्तदान करणाऱ्या 52 रक्तदात्यांचा रक्तविर म्हणून लदाख राज्याचे उपराज्यपाल कविंन्द्र गुप्ता यांच्या हस्ते गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी 50 वेळा रक्तदान करणारे आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन (महाराष्ट्र) रायगड अध्यक्ष कैलास पोटे यांचा प्रथम सत्कार करण्यात आला. तसेच रायगड जिल्ह्यातील 103 पेक्षा अधिक वेळा रक्तदान करणारे कर्जत येथील सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी तसेच पनवेल येथील 140 वेळा रक्तदान करणारे विजय तांबोळी यांचा महारक्तविर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. व कर्जत येथील सतीश पिंपरे यांचा 77 पेक्षा अधिक वेळा रक्तदान केल्याने त्यांना रक्तविर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन आंतरराष्ट्रीय वैश्य फेडरेशन अध्यक्ष अशोक आग्रवाल यांनी केले. यावसंगी व्यासपीठावर राज्यसभेचे खासदार नरेश बंसल (उत्तराखंड), अशोक मित्तंल (पजांब), धर्मशीला गुप्ता (बिहार), सुजित कुमार (ओडीसा), रामेश्वर तेली (आसाम), खासदार दामोदर अग्रवाल (राजस्थान), सुधीर गुप्ता (मध्यप्रदेश), डॉ. संजय जयस्वाल (बिहार) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




# देगलूर पब्लिक इंग्लिश स्कुलमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**.तालूका प्रतिनिधी :महादेव उप्पे**

देगलूर(दि.२५) स्वातंत्र्य दिनानिमित्त देगलूर पब्लिक स्कुलमध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून या शिबीरात प्रथमच अमुल्य, अतुल्य क्वचित असलेले A- निगेटिव्ह रक्तगट रक्तदान करताना आमचे मार्गदर्शक नेते शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, युवासेना प्रमुख भागवत पाटील सोमूरकर यांच्यासह अनेकांनी रक्तदान केले.

यावेळी सोबत युवा सेना पदाधिकारी राहुल सोनकांबळे व शाळेचे डायरेक्टर सिमा ईमरान मॅडम,शिरीन बेग मॅडम,केंद्र प्रमुख पचंडे सर,मोहद सोहेल जिलानी सर,मुमताज बेग,मुजाहेद बेग व चांद पाशा मुजावर हणेगावकर अजित पाटील,माधव मैलारे व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थितीत होते.



# येवला- लासलगाव मतदार संघातून मुंबई आंदोलकांना जाणार भाकरी आणि भाजी

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर:** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली २९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या आंदोलनात सहभागी होणाऱ्या लाखो मराठा बांधवांसाठी, विशेषतः 'एक भाकर समाजासाठी' या अनोख्या उपक्रमातून मदतीचा हात पुढे करण्यात येत आहे. येवला–लासलगाव मतदारसंघातही या उपक्रमाला प्रचंड पाठिंबा मिळत असून, मराठा समाजबांधवांनी एकत्र येत आंदोलनाचे यशस्वी नियोजन केले आहे.



येवला आणि लासलगाव मतदारसंघातील सकल मराठा समाजाची नुकतीच भरवस फाटा येथे एक महत्त्वाची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत मुंबईतील आंदोलनासाठीच्या तयारीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आपल्या हक्कांसाठी लढणाऱ्या बांधवांना कोणत्याही परिस्थितीत उपाशी राहावे लागणार नाही, याची काळजी घेण्यासाठी 'एक भाकर समाजासाठी' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत गावागावातून भाकरी आणि चटणी/भाजी गोळा करून मुंबईत आंदोलस्थळी पाठवण्यात येणार आहे.

या बैठकीत शाहूराजे शिंदे,सचिन आहेर, प्रवीण कदम, शिवा सुराशे, गोपीनाथ ठुबे, केदार नवले, प्रसाद फापाळे, पंडित मुदगुल, राकेश फापाळे, पवन फापाळे,विक्रम शिंदे, दत्ता दरेकर , अभिजीत डुकरे, अमित मुदगुल, संदीप फापाळे,केदार फापाळे,योगेश भोसले, हर्षल काळे,तुषार थेटे,विजय मुदगुल यांच्यासह अनेक मराठा बांधव उपस्थित होते. सर्वांनी एकमताने जरांगे पाटील यांच्यासोबत शेवटच्या श्वासापर्यंत एकनिष्ठ राहण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी 'एक मराठा, लाख मराठा' आणि 'चलो मुंबई' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

कार्यकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ ऑगस्ट पासून सर्व तालुक्यातून जमा झालेल्या भाकरी मुंबईकडे रवाना केल्या जाणार आहेत. हा उपक्रम केवळ जेवणाची सोय नसून, संपूर्ण मराठा समाजाच्या एकतेचे आणि परस्पर सहकार्याचे प्रतीक आहे. 'पाटलांनी सांभाळावं मराठ्यांना आणि मराठ्यांनी सांभाळावं पाटलांना' हा संदेश देत समाजातील प्रत्येक व्यक्ती या आंदोलनाचा एक अविभाज्य भाग बनत आहे.

हा उपक्रम हा फक्त एक भाकरी देण्याचा नव्हे, तर आपल्या बांधवांच्या लढ्याला भावनिक आणि नैतिक पाठिंबा देण्याचा प्रयत्न आहे. ही वेळ एकजुटीची असून, आपल्या हक्कांसाठी एकत्र येऊन लढा देण्याची प्रेरणा या उपक्रमातून मिळते आहे. या सामूहिक प्रयत्नांमुळे मुंबईतील आंदोलनाला नक्कीच बळ मिळेल आणि मराठा समाज आपल्या न्याय्य हक्कांसाठी यशस्वीपणे संघर्ष करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# अंबा नदीत तोल जाऊन पडलेल्या अन्वर पिंजारीचे प्रेत सापडले ; साधारण 48 तासांनी लागला शोध

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

मोहल्ला मधील रहिवासी वाहन चालक असलेला अन्वर अजीज पिंजारी वय 55 वर्षे हा शनिवार 23 ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास ऐतिहासिक नागोठणे – वरवठणे पूलावरून जात असता तोल जाऊन पाण्यात पडून वाहून गेला होता. त्यांचे प्रेत साधारण 48 तासांनी सोमवार 25 ऑगस्ट रोजी सकाळी 10.00 वाजण्याच्या सुमारास सांबरी येथील खाडी पात्रात सापडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,नागोठणे मोहल्ला येथील रहिवासी व वाहन चालक अन्वर अजीज पिंजारी हा शनिवारी सकाळी 10.30 वाजण्याच्या सुमारास ऐतिहासिक नागोठणे – वरवठणे पूलावरून चालत जात असताना त्याचा तोल जाऊन पाण्यात पडला. त्यानंतर त्यांनी पाण्यात पूलाच्या कठड्याचा आधार घेतला.याची माहिती पोलिस व ग्रामस्थ यांना मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी त्याला दोर टाकून वाचविण्याचा प्रयत्न केला परंतु दोर हातातून सुटल्याने अन्वर हा वाहत्या पाण्यात वाहून जात असताना पोलिस शिपाई प्रकाश हंबीर यांनी त्याला वाचविण्यासाठी पाण्यात उडी घेतली पण पाण्याच्या जास्त प्रवाहामुळे ते अन्वरला वाचवू शकले नाही. पोलिस व ग्रामस्थांनी बराच वेळ शोधा शोध करूनही नदीला जास्त पाणी असल्याने तो कुठेही सापडला नाही. त्यानंतर आलेल्या रेस्क्यू टिम सतत दोन दिवस शोधण्याचा प्रयत्न करीत होते. त्या प्रयत्नाला साधारण 48 तासांनी यश आले असून अन्वर याचे प्रेत अलिबाग तालुक्यातील सांबरी गावाच्या अंबा खाडी पात्रात सापडले आहे.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे देवद, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे विकसनाचे सर्व हक्क माझे आशिल यानी घेण्याचे ठरविले आहे. सदर भूखंडाचे वर्णन व विदयमान कब्जेदारांची नावे खालील प्रमाणे–

**मिळकतीचे वर्णनः**
**मौजे देवद, ता. पनवेल, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट कमांक व उपविभाग | भुधारणा पध्दती | क्षेत्र | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १. श्री. चंद्रकांत शांतीलाल जैन<br>२. श्री शशिकांत तुळजाराम जाधव<br>३. श्री. विनोद पारसमल पालरेशा | ३२/१ | भोगवटादार वर्ग १ | ०-५३-८०<br>पो ख ०-०६-००<br>एकुण ०-६०-७० | ६.४९ |
| मे/स. बेस्ट एंटरप्रायझेस तर्फे भागीदार<br>१. श्री. चंद्रकांत शांतीलाल जैन<br>२. श्री शशिकांत तुळजाराम जाधव<br>३. श्री. विनोद पारसमल पालरेशा | ९/३ | भोगवटादार वर्ग १ | ०-२१-९०<br>पो ख ०-०३-१०<br>एकुण ०-२५-०० | २.७६ |
| मे/स. बेस्ट एंटरप्रायझेस तर्फे भागीदार<br>१. श्री. चंद्रकांत शांतीलाल जैन<br>२. श्री शशिकांत तुळजाराम जाधव<br>३. श्री. विनोद पारसमल पालरेशा | ३२/२ | भोगवटादार वर्ग १ | ०-०६-३० | १.०० |

सदर मिळकत नवी मुंबई विमानतळ बाधित क्षेत्रात येत असुन सिडको तर्फे नैना ही संस्था सहयोगी नियोजनकार म्हणून कार्यरत आहे. सदर मिळकती विकसन करणेबाबत भविष्यात नैना तर्फे वरील मिळकतीच्या मोबदल्यात जो अंतिम भुखंड देण्यात येईल तो भखंड वरील भुखंड मालक व माझे अशिल यांनी भागीदारी तत्वावर विकसीत करण्याचे ठरविले आहे. तरी सदर नमुद मिळकतीवर इतर कोणाचे गहाण, दान, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहीवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात माझे अशिल विकसनाचा करार करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाणः पनवेल
दिनांकः २३/०८/२०२५

सही/–
सौ. शारदा उत्तम पिंजारी
ॲडव्होकेट व नोटरी
ऑफिस. ११ व १२, सत्य साई प्लाझा,
सेक्टर–११, नवीन पनवेल
फोन नं. ०२२–२७४८२१८७

# नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवेंनी दिली भेट

**दैनिक युवक आधार**
**नांदेड पप्पू वाघमारे**

जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील लेंडी धरणाच्या पाण्याखाली गेलेल्या हसनाळ गावाची आज पाहणी केली. धरणक्षेत्रात १८ ऑगस्टच्या मध्यरात्री अतिप्रचंड पाऊस झाल्याने हसनाळ गावांमध्ये पाणी शिरल होतं

इयत्ता १२ वीत माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय, चव्हाणवाडी येथे विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या भगिनी स्वाती केरबा गुमडवाड या मुलीचे शैक्षणिक साहित्य या पाण्यात बुडाल्याने पुढील शिक्षणासाठी तिला लॅपटॉप भेट दिला. देगलूर मुखेड तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पाण्याखाली बुडलेल्या कुटुंबियांना मदत व्हावी यासाठी अन्नधान्य व घरगुती वापराच्या वस्तू यावेळी देण्यात आल्या.

लेंडी नदीला आलेल्या पुराने संपूर्ण हसनाळ, रावणगाव,भिंगोली व भासवाडी गाव पाण्याखाली गेलं होतं. यामुळे एकूण ५ गावकऱ्यांचा बुडून मृत्यू झाला असल्याने गावकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे.

जलसंपदा कार्यकारी अभियंता यांनी गावकऱ्यांमध्ये गैरसमज निर्माण केल्याने सदरील घटना घडली आहे. शासनाने या गंभीर घटनेची दखल घेऊन या कार्यकारी अभियंत्यांवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी यावेळी केली आहे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी केली आहे

संपूर्ण हसनाळ गाव पाण्याखाली गेल्याने गावकऱ्यांचे घर, पाळीव जनावरे आणि संपूर्ण संसारच उध्वस्त झाला आहे. गावकऱ्यांचा संपूर्ण संसार उध्वस्त झाल्याने अडचणीत असणाऱ्या गावकऱ्यांना मदत होण्यासाठी आर्थिक पाठबळ देण्यात यावे.

याप्रसंगी शिवसेना उपनेते बबनराव बारसे, सतीश पाटील उमरेकर व बालाजी गाडेकर उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# तळा येथे प्रा दिवाकर कदम व सौ नम्रता मुतंगे यांचा सेवापूर्ती समारंभ भावनिक वातावरणात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तळा वार्ताहर**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्रा दिवाकर धोंडू कदम व गो. म. वेदक विद्यामंदिरच्या आदरणीय शिक्षिका सौ. नम्रता नागप्पा मुतंगे यांचा सेवापूर्ती समारंभ मोठ्या उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला.

याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के गुरुजी, अध्यक्ष चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष पत्रकार पुरुषोत्तम मुळे, सचिव मंगेशशेठ देशमुख, कार्यकारी मंडळाचे सदस्य किरणशेठ देशमुख, डॉ सतिश वडके, दिपकशेठ कोटीया, राजू सप्रे, सौ देशमुख, सौ सप्रे, माजी प्राचार्य डॉ राजेंद्र कांकरिया, प्राचार्य डॉ नानासाहेब यादव, मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, सचिन भाटे, सत्कारमूर्तींचे नातेवाईक, मित्र, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, माजी विद्यार्थी व स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्राथमिक विद्यामंदिर, गो म वेदक विद्यामंदिर, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, द ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, माजी सेवक शंकर वाघमारे, विनोद कोलवणकर, जानराव सर, प्रा दत्ता कुंटेवाड, डॉ राजेंद्र कांकरिया, पत्रकार पुरुषोत्तम मुळे, मित्र व नातेवाईकांच्या वतीने प्रा दिवाकर कदम व सौ नम्रता मुतंगे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. प्रा दिवाकर कदम ५ सप्टेंबर २०११ रोजी द ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयात रुजू होऊन १४ वर्ष शैक्षणिक सेवा केली. त्यांनी २ विषयात पीएच डी केली असून अन्य क्षेत्रातही पदव्या प्राप्त केल्या आहेत.सौ नम्रता मुतंगे १९ ऑगस्ट १९८६ रोजी गो म वेदक विद्यामंदिर तळा येथे रुजू होऊन त्यांनी ३९ वर्ष शैक्षणिक सेवा पूर्ण केली. या दोन्ही सत्कारमूर्तींनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले. त्यांच्या अध्यापनशैलीतून विद्यार्थ्यांना ज्ञानासोबतच जीवनमूल्यांचे धडेही दिले.



सेवापूर्ती समारंभात विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी दोन्ही शिक्षकांच्या समर्पणाची, प्रामाणिकपणाची व विद्यार्थ्यांविषयी असलेल्या कळकळीची दखल घेतली. "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकाची भूमिका अत्यंत मोलाची असते, आणि कदम सर व मुतंगे मॅडम यांनी ती भूमिका यशस्वीपणे पार पाडली," असे प्राध भगवान लोखंडे, रोहित भागवत, सौ जयश्री मचे, प्रा सर्जे व्ही बी, मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, प्राध्यापिका तृप्ती थोरात, प्रकाश गायकवाड, प्रा दत्ता कुंटेवाड, डॉ राजेंद्र कांकरिया, यशश्री मुतंगे, राजू सावंत, पाटील सर, मारुती शिर्के गुरुजी, पुरुषोत्तम मुळे, मंगेशशेठ देशमुख, चंद्रकांत रोडे यांनी आपल्या मनोगतातून सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा दिवाकर कदम व सौ. नम्रता मुतंगे यांनी सत्काराला उत्तर दिले. समारंभाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ नानासाहेब यादव तर निवेदन प्रा पाटील एन सी यांनी केले. यावेळी संपूर्ण कार्यक्रमात भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

## को.म.सा.प.च्या रायगड जिल्हा अध्यक्षपदी संजय गुंजाळ तर केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी म्हणून गणेश कोळी

**दैनिक युवक आधार**
**पंडीत फंगाळ (पनवेल):**

कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याच्या अध्यक्षपदी संजय गुंजाळ तर केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी म्हणून गणेश कोळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील रोहा येथे कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याच्या झालेल्या सर्वसाधारण सभेत नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड झाली.यामध्ये जिल्हा अध्यक्षपदी संजय गुंजाळ, केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी : गणेश कोळी, उपाध्यक्षपदी पुरुषोत्तम मुळे,कार्यवाह: संजय होळकर, कार्याध्यक्षा : रेखा कोरे,कोषाध्यक्ष: एड.गोपाळ शेळके,जिल्हा समन्वयक: सुखद राणे तर कार्यकारिणी सदस्य धनंजय गद्रे,सुभाष कुडके,मच्छिंद्र म्हात्रे,रामजी कदम, प्रविता माने,रमेश धनावडे,गंगाधर साळवी,ज्योत्स्ना राजपूत,लवेंद्र मोकल तर महिला प्रमुख संध्या दिवकर युवाशक्ती प्रमुख सिद्धेश लखमदे यांची निवड झाली.उर्वरित कार्यकारणीतील पदाधिकारी व सदस्यांची नावे लवकरच जाहीर करण्यात येतील.कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी नूतन कार्यकारिणीचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.



## श्रीयांश बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य व नेक्स्ट ऑपॉर्च्युनिटी अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक धाव नवीन स्वप्नांची

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी नामदेव**
**मंडपे मंठा जालना**

यानुसार मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.* यामध्ये मुली व मुलांनी स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला.सकाळी ठीक 7: 30 मिनिटांनी शाळेमध्ये *राष्ट्रगीत* घेऊन सर्व स्पर्धकांना मॅरेथॉनचे नियम सांगितले.वाटुर परतुर रोडवर शाळेच्या मेन गेटवरून ते वाटुर फाटा येथील *छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत* परत रिटर्न शाळेच्या मेन गेट पर्यंत मॅरेथॉन आयोजित करण्यात आली.प्रथम मुलींमधून 1) *कु.टेहळे वैष्णवी मारुती* 2) दुतीय *कु. मार्कड ज्ञानेश्वरी भारत* .3) तृतीय *कु. वाघमोडे शीतल राजाभाऊ* व मुलांमधून 1) प्रथम चव्हाण करण राजेश 2) द्वितीय राठोड वैभव रमेश 3) तृतीये सय्यद सोहेल रज्जाक या विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकावले व सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.प्रसंगी मॅरेथॉनचे उद्घाटक म्हणून शाळेचे आदर्श मुख्याध्यापक *श्रीमान विजयकुमार खरात सर* , यांच्या मनोगताने मॅरेथॉनचे उद्घाटन झाले. व मंचावरील सर्व उपस्थितत्यांचे मॅरेथॉनचे आयोजक नेक्स्ट अपॉर्च्युनिटी अकॅडमी चे संचालक *श्री. प्रशांत प्रधान सर* यांच्यावतीने स्वागत करण्यात आले. प्रसंगी अध्यक्ष म्हणून शाळेचे. मुख्याध्यापक श्री. विजय कुमार खरात सर, उद्घाटक श्री, खंदारे साहेब, पर्यवेक्षक श्री. सिरसाठ सर, मॅरेथॉन चे आयोजक श्री. प्रशांत प्रधान सर, श्री. संजय आवारे सर डॉ. कदम साहेब.श्री प्रधान सर,वार्ताहर रवी भैया जैयस्वाल, डॉ.सुरज सुपेकर मा. सरपंच सुरेश आढे, काळे सर, ज्येष्ठ नागरिक सिद्धू बप्पा खांडेभराड,श्री अशोक राव प्रधान,कौशल्य अशोक प्रधान व सर्व गावकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. काळे सर यांनी केले.

# शेलूबाजार येथे शिवसेना वतीने शिक्षण महर्षी रजनीष कर्नावट यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा संप्पन्न.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम:-** मंगरूळनाथ तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे वतीने श्री लक्ष्मीकांत कर्नावट विद्यालय शेलूबाजार येथे युवा शिक्षण महर्षी श्री रजनीष भाई कर्नावट यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला.
यावेळी श्री रजनीश भाई कर्नावट मित्र मंडळ वतीने श्री भोलेनाथ वृद्धाश्रम वनोजा (फाटा )येथील आबाल वृद्धाना जीवन आवश्यक किराणा वस्तू किट वाटप करण्यात आला
या नंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे वतीने शिक्षण महर्षी श्री रजनीश भाई कर्नावट यांचा भावपुर्ण सत्कार करण्यात आला.




या अभिष्टचिंतन सोहळा प्रसंगी, तालुका प्रमुख रामदास पाटील सुर्वे जेष्ठ मार्गदर्शक मधुकर जी वाडेकर, शालिकराम घोडे, विठ्ठल जी लांबडेआरोग्य सेना जिल्हा प्रमुख शिवा सावके, संतोष लांबडे, अशोकराव खंडारे,उप तालुका प्रमुख भागवत जी शिंदे, तालुका संघटक बबनराव सावके पाटीलतालुका मार्गदर्शक अशोकराव हांडे सर, वनोजा येथील विठ्ठलराव राऊत, डॉ. सुनील राऊत, दिलीप राऊत,गोवर्धन पाटील तंटामुक्ती अध्यक्ष दत्ता भाऊ वायाले, संजय तिरके, दिलीप उपाध्ये, उमेश राठोड, वसंता चव्हाण, माळशेलू येथील प्रल्हाद राठोड, देविदास जाधव,कैलास राठोड, नांदखेडा येथील सचिनभाऊ जायेभाये, चंद्र शेखर जायेभाये, तांदळी येथील रामू राठोड, नरेंद्र येवले, चिखली येथील सचिनभाऊ राऊत, सुभाष चौधरी, श्याम टेलर, राजकीनही येथील धीरज आप्पा जी, नागीयेथील बाळकृष्ण रोकडे, गणेश राऊत, चांभाई येथील निलेश भाई फुके, अमोल दादा ठाकरे शेलूबाजार येथील पंचक्रोशीतील सर्व व्यापारी वर्ग, सर्व चाहता वर्गविविध संघटना चे सर्व पदाधिकारी, सरपंच, उप सरपंच ग्रामपंचायत सदस्य शेलूबाजार, गणमान्य प्रतिष्ठान वेक्ती,श्री लक्ष्मीचंद जी कर्नावट विदयालय तथा निर्मला बाई कर्नावटइंगलीश हायस्कूल शेलूबाजार, शिक्षक तथा कर्मचारी वृंद,मोठया संख्येने उपस्थित होते.

## रस्त्याच्या मधोमध असलेला कचरा डब्बा बाजूला करुन परिसर स्वच्छ करणार का

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**

खार पुर्व पाईप लाईन रोड डॉ. ओमप्रकाश शर्मा क्लिनिक समोर एक कचरा चा डबा आहे. तो डबा गेले अनेक दिवस व महिन्यापासून बरोबर रस्त्याच्या मध्यभागी आहे. त्यामुळे येथून जाता येताना नागरिकांना व वाहनांना खूप त्रास सहन करावा लागतो. त्याच बरोबर या डब्याच्या अवती भवती घाणीचे साम्राज्य पसरले
आहे. या कचऱ्याच्या डब्याची खरी जागा आत मध्ये लाल भिंती जवळ आले पण ती जागा सतत बदलली का ! जाते आणि डबा मधोमध कोण आणून ठेवला जातो. सद्या गणपती बाप्पाच्या आगमनाचे दिवस चालू झाले आहेत. विभागातील अनेक घरगुती व सार्वजनिक गणपती बाप्पा याच मार्गावरून वाट काढत जात असतात,



या ठिकाणी आल्यावर घाणीच्या वासांनी त्यांनां आपले नाक मुठीत धरून जावे लागते. त्यामुळे त्यांना या त्रासाचा खूप त्रास करावा लागतो. समधित एच पुर्व महानगरपालिका विभाग अधिकाऱ्यांनी या तक्रारीची दखल घेऊन, गणपती उत्सवापुर्वी या जागेवरील कचरा डबा आपल्या पुर्वीच्या जागेवर ठेवण्यासाठी आपल्या कर्मचाऱ्यांना आदेश द्यावेत. आणि हा परिसर साफ व स्वच्छ करुन सहकार्य करावे.



शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पद नियुक्ती कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमांमध्ये मा. आमदार श्री. बाळाराम पाटील साहेब यांच्या हस्ते माझी श्री. शरद मारुती घुले, पनवेल महानगरपालिका जिल्हा, वाहतूक सेल अध्यक्ष पदी निवड करण्यात आली
यावेळी पनवेल विधानसभा अध्यक्ष, काशिनाथ पाटील साहेब. पनवेल महानगरपालिका जिल्हा चिटणीस श्री. प्रकाश म्हात्रे साहेब. नगरसेविका, प्रज्योती प्रकाश म्हात्रे ज्यांची आज पनवेल महानगरपालिका जिल्हा सहचिटणीस म्हणून नियुक्ती झाली ते बबन विश्वकर्मा उपस्थित होते
माझ्याबरोबरच नवीन पनवेल सांस्कृतिक सेल अध्यक्षपदी, संगम काशीराम पवार. नवीन पनवेल महिला आघाडी पदी, मनीषा भुर्के मॅडम* तसेच नवीन पनवेल वार्ड 16 मधील अनेक पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली

## मुदगल येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**पाथरी तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे**

तालुक्यातील मुदगल येथे दि २४ ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली सरपंच लक्ष्मीकांत तिडके पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला यावेळी सचिन कांबळे ( डि पी आय जिल्हा अध्यक्ष परभणी) गोविंद गोचडे बळीराम काटे ॲड संदिप दातरे पोलिस पाटील रामकिशन घोडके उपसरपंच राजेश घोडके अन्सीराम काळे ( जेष्ठ नेते) विश्वनाथ घोडके यावेळी उपस्थित होते जयंती अध्यक्ष धोंडिराम कांबळे उपाध्यक्ष करण काळे सतिश कांबळे भागवत काळे रानबा कांबळे यांनी परिश्रम घेतला व यावेळी समाजबांधवांस ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते व नंतर चार वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे मिरवणूक काढण्यात आली यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# आमदार प्रशांत ठाकूर चषक : वक्तृत्व स्पर्धा २०२५ महाअंतिम फेरी उत्साहात संपन्न!

### वक्तृत्व स्पर्धेत १६,८०० पेक्षा जास्त स्पर्धक लाभणे हा मोठा रेकॉर्डच असेल -नितीन पाटील

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "आमदार प्रशांत ठाकूर चषक : वक्तृत्व स्पर्धा २०२५" या उपक्रमाची महाअंतिम फेरी दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी यशस्वीपणे संपन्न झाली. या उपक्रमात पनवेल क्षेत्रातून तब्बल १६,८८७ स्पर्धकांमधून निवडलेले ७१३ विद्यार्थी सहभागी झाले होते. सी. के. ठाकूर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स खांदा कॉलनी आणि लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय पनवेल या ठिकाणी महा अंतिम फेरी पार पडली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे माजी




शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण, नविन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, ॲड. चेतन जाधव, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक पटवर्धन, ॲड. चिन्मय समेळ, नितेश पाटील, अक्षय सिंग आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्साहाने अनेक सामाजिक व बौद्धिक विषयांवर आपली मतं मांडली. त्यामध्ये माझा आवडता सुपरहीरो, जर मी पक्षी असतो, माझा आवडता विज्ञाननायक, स्वच्छ भारत प्लास्टिक मुक्त भारत, इंटरनेट – वरदान की शाप?, कृत्रिम बुद्धिमत्ता – धोका की वरदान? वेळेचे महत्त्व, अपयश हे यशाचे पायरी आहे हे विचारांना आकार देणारे विषय होते. स्पर्धकांच्या भाषणांमधून विद्यार्थ्यांची सृजनशीलता, संवेदनशीलता आणि वक्तृत्वकौशल्य ठळकपणे दिसून आले. या महाअंतिम फेरीत पनवेल व आसपासच्या नामांकित शाळांचा भव्य सहभाग होता. त्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर शाळा उलवे, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल कामोठे, सुधागड एज्युकेशन सोसायटी कळंबोली, सुषमा पाटील विद्यालय कामोठे, सी. के. ठाकूर विद्यालय नवीन पनवेल, पनवेल महानगरपालिका शाळा, जिल्हा परिषद शाळा पनवेल तालुका व ग्रामीण भागतसेच इतर अनेक शाळांचा समावेश होता. महाअंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना चषक व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहे.

कोशिश फाऊंडेशनने आयोजित केलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक वत्कृत्व स्पर्धेचा दर्जा फारच मोठा आहे त्यामध्ये हजारो विद्यार्थ्यांना संधी मिळाली आणि या कार्यक्रमामध्ये आम्हाला देखील संधी दिली त्याबद्दल आयोजकांचे धन्यवाद. – **अनिल भगत**

वक्तृत्व स्पर्धेत १६,८०० पेक्षा जास्त स्पर्धक लाभणे हा मोठा रेकॉर्डच असेल, कोशिश फाऊंडेशन च्या वतीने आयोजित ही आमदार प्रशांत ठाकूर चषक ही वत्कृत्व स्पर्धा महाराष्ट्रात १ क्रमांक ची असू शकेल आयोजकांचे अभिनंदन !!– **नितीन पाटील**

## मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात कायदेविषयक जनजागृती शिबिर

**दैनिक युवक आधार**
**पंडीत फंगाळ (पनवेल) :**

मुरुड तालुका विधी सेवा समिती, तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश जी.आर.तिवारी (क स्तर) यांच्या अध्यक्षतेखाली वसंतराव नाईक महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य डॉ.जी.डी.मुनेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे कायदेविषयक जनजागृती शिबिर घेण्यात आले.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.यावेळी तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश जी.आर. तिवारी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना NALSA (JAGRITI–Justice) तळागाळातील माहिती व पारदर्शकता उपक्रमासाठी न्याय जागरूकता योजना २०२५ बाबत समितीचे कार्य, जबाबदारी व राबविण्यात येणा–या उपक्रम व सुविधांबाबत माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांचे होणारे रॅगिंग, लैगिंक शोषण व अत्याचार इ. विषयांवर कायदेविषयक मार्गदर्शन केले.

कायदेविषयक जनजागृती शिबीराचे प्रमुख वक्ते अड. डी. एन. पाटील, सचिव, वकील बार मुरुड यांनी Anti Ragging Laws, अड.फैसल जामदार यांनी Female Foeticide and other prevalent social evils a Legal Literacy relating to Social evils like Dowry तसेच अड. विनायक शेडगे यांनी POCSO Act at




Schools and Colleges या विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले.

लोकपाल ऑफ इंडिया बाबतचा Vid–eo दाखविण्यात आला तसेच विदयार्थ्यांमध्ये विधी सेवा प्राधिकरणा मार्फत पुरविण्यात येणा–या सुविधा, योजना व हेल्पलाईन क्रमांक १५१०० इ. विषयी पॅम्पलेटसचे वाटप करण्यात आले.यावेळी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.एस.एस.भैरगुंडे,सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. जी. डी. मुनेश्वर, सुत्रसंचालन डॉ.एस.एल.म्हात्रे तर दिवाणी न्यायालयाचे वरीष्ठ लिपिक मतिन अधिकारी यांनी आभार मानले.

# जीवनदीप प्रकाशन मीडिया मॅनेजर डॉ. गोरखनाथ पोळ यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ‘सुवर्णपथ’ ग्रंथाचे प्रकाशन

**जीवनदीप प्रकाशन मीडिया मॅनेजर डॉ. गोरखनाथ पोळ यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ‘सुवर्णपथ’ ग्रंथाचे प्रकाशन**
**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

जीवनदीप प्रकाशन मीडिया चे मॅनेजर डॉ. गोरखनाथ पोळ यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करणारा ‘सुवर्णपथ – जीवनदीप ते ज्ञानदीप’ हा ग्रंथ आज एका भव्य सोहळ्यात प्रकाशित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे इंडियन ऑइलचे माजी अधिकारी सुरेश केदारे, जीवनदी प्रकाशनचे प्रमुख जीत फुरिया, माजी पोलिस अधिकारी जाधव, इंटरनॅशनल स्पीकर डॉ. पवन अग्रवाल, शिवव्याख्याते प्रा. रवींद्र पाटील, हास्य अभिनेते जॉनी रावत व विजय कदम, केतकी प्रकाशनचे चंद्रकांत जाधव हे होते. कार्यक्रमाचे आयोजन मंदार पनवेलकर, अनंता धरणेकर, कुमारी




मानसी पोळ यांनी केले होते.

प्रमुख पाहुणे सुरेश केदारे यांनी भाषणात डॉ. पोळ यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करताना, “डॉ. गोरखनाथ पोळ यांनी माणसं जोडली आणि ती नातं जपत ठेवली हीच त्यांची खरी संपत्ती आहे,” असे सांगितले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना जीवनदी प्रकाशनचे प्रमुख जीत फुरिया म्हणाले, “मागील २५ वर्षांपासून डॉ. पोळ हे जीवनदी प्रकाशनचा कणा आहेत. आम्ही जरी मालक असलो तरी आमच्या यशामागचे खरे श्रेय त्यांचे आहे,” असे मत त्यांनी व्यक्त केले.इंटरनॅशनल स्पीकर डॉ. पवन अग्रवाल यांनी “मित्र कसा असावा” यावर भाष्य करत मुंबई डबेवाल्यांचे उदाहरण दिले आणि त्यांच्या प्रतीकात्मक सायकल व डब्याची भेट देऊन डॉ. पोळ यांचा सन्मान केला. लेखिका स्मिता पनवेलकर यांनी मागील २७ वर्षांचा इतिहास सांगताना “डॉ. पोळ आमच्यासाठी फक्त सहकारी नसून भाऊसमान आहेत,” असे भावनिक शब्द उच्चारले.

कार्यक्रमाला पोळ सरांचे मित्रपरिवार, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडलेला हा सोहळा डॉ. पोळ यांच्या आयुष्यातील एक संस्मरणीय क्षण ठरला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण लांडगे पाटील यांनी केले तर सुयश सामाजिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रमेश संकपाळ यांनी आभार मानले

# शिवसेना (शिंदे गट) च्या उरण विधानसभा मतदारसंघाच्या उपतालुका प्रमुख वैजयंती ठाकूर यांच्या प्रयत्नातून तुराडे गावाला जिमचे साहित्य भेट



**दैनिक युवक आधार**
**रसायनी आनंद पवार**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून उरण विधानसभा मतदारसंघाच्या शिवसेनेच्या उपतालुकाप्रमुख वैजयंती ताई ठाकूर यांनी राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांच्या कडे वेळोवेळी पाठपुरावा करून पनवेल तालुक्यातील तुराडे येथे जिमचे साहित्यासाठी साठी सात लाख रुपयांचा भरघोस निधी आणल्यामुळे तुराडे गावातील ग्रामस्थांनी वैजयंतीताई ठाकूर यांचे आभार व्यक्त केले.
समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून वैजयंतीताई ठाकूर यांनी आपल्या जन्म गावी तुराडे येथे तरुणांसाठी जिम साठी लागणारे सात लाख रुपयांचे साहित्य उद्योगमंत्री नामदार सामंत यांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. शुक्रवार दि.१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून या जिमचे शानदार उद्घाटन करण्यात आले यावेळी तुराडे ग्रामपंचायतीच्या सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड,उपसरपंच प्रिया प्रदीप माळी यांच्यासह ग्रामपंचायतीचे आजी-माजी सदस्य ग्रामविकास अधिकारी प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरण तालुक्याती भेंडखळ गावचे समाजसेवक जगन्नाथ रघुनाथ पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**




उरण तालुक्यातील भेंडखळ गावचे कै. रघुनाथ मामंजी पाटील आणि कै. शारजूबाई रघुनाथ पाटील यांचे सुपुत्र, कम्युनिस्ट कामगार नेते कै. कॉम्रेड कृष्णा रघुनाथ पाटील यांचे कनिष्ठ बंधू आणि १९८४ साली शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी दिवंगत लोकनेते डी. बी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्तांनी उरण तालुक्यातील जासई येथे प्रकल्पग्रस्तांच्या तीव्र निदर्शनांना उभारी दिली होती त्या आंदोलनात सक्रिय सहभाग असणाऱ्या आघाडीच्या कट्टर आंदोलकांच्या यादीत अग्रस्थानी विराजमान, थोर समाजसेवक आणि भेंडखळ गावचे रहिवासी जगन्नाथ रघुनाथ पाटील यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी शनिवार दिनांक २३ ऑगस्ट, २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आणि उरण, नवघर, पागोटे, बोकडवीरा जासई, चिरनेर, विंधणे आणि पनवेल भागातील त्यांच्या तमाम संबंधितांनी एक लढवैय्या सेनानी गमावल्याची हळहळ अंत्यविधी दरम्यानच्या शोकसभेत व्यक्त केली. सुप्रसिद्ध कवी, लेखक, विचारवंत आणि प्राध्यापक माननीय श्री एल. बी. पाटील यांनी पाच हुतात्मा आणि असंख्य जखमी भूमिपुत्रांच्या, जानेवारी १९८४ च्या प्रखर, कडव्या, गौरवशाली आणि शूर लढ्यातील पहिल्या फळीतील कट्टर आंदोलक म्हणून पोलीस दलाच्या असंख्य लाठ्या काठ्या खाल्लेल्या जगन्नाथ रघुनाथ पाटील या शूर योद्ध्याचं वास्तववादी आणि उपस्थितांचा थरकाप उडवणारं वर्णन करून गत स्मृतींनां उजाळा देत सार्थ श्रद्धांजली वाहिली. स्वतःच्या कुटुंब परिवाराच्या जबाबदाऱ्या सांभाळतांना त्यांनी नेहमीच निःस्पृह विधायक समाज सेवेला प्राथमिकता दिली आणि आयुष्यभर समाजसेवेचं व्रत निःस्वार्थीपणे जोपासलं.
भाऊ या प्रेमळ संबोधनांनं सुपरिचित होते.ज्योत अनंतात विलीन झाली! स्मृती आठवणींना दाटून आली !! भाव सुमनांची ओंजळ भरुनी !!! वाहतो आम्हीं सुमनंश्रद्धांजली !!!!
शोकाकुल मुलगा संदीप जगन्नाथ पाटील, पत्नी गं.भा.भागाबाई जगन्नाथ पाटील,लौकिक संदीप पाटील,ॲडव्होकेट श्री.डी.के. पाटील
आणि समस्त पाटील कुटुंब परिवार.यावेळी त्यांच्या अंतयात्रेला भेंडखळ गावासह उरण तालुक्यातील असंख्ये नागरिक उपस्थीत होते.

# महावितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे वाई येथे पाणीपुरवठा बंद

**दैनिक युवक आधार**
**जालना प्रतिनिधी: नामदेव मंडपे मंठा**

मंठा तालुक्यातील वाई येथे दीड ते दोन हजार लोकसंख्येचे गाव असून या गावाला पिण्याचे पाणी गेल्या दोन-तीन दिवसापासून मिळत नसल्यामुळे गावातील नागरिक मात्र पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. महावितरणाचा पोल कोसळल्यामुळे गेल्या अनेक दिवसापासून वाई मध्ये पाणीपुरवठा बंद आहे याकडे मात्र महावितरण कंपनीने जातीने लक्ष घालून लाईट व्यवस्थित



करावी, अशी मागणी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे तरी महावितरण कंपनीने तात्काळ पडलेला पोल उभा करून पाणीपुरवठ्याची लाईट सुरळीत करून देण्यात यावी.

## तरुण तडफदार पत्रकार केवल महाडिक यांना दैनिक युवक आधारचा "उत्कृष्ट व प्रेरणादायी लेखणी" पुरस्कार जाहीर.

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**

रायगड – नवी मुंबई परिसरातील लहान मोठ्या घडामोडीवर नजर ठेवून अन्यायाला आपल्या डॅशिंग लिखाणाने वाचा फोडणारे रायगडचा भूमिपुत्रचे संपादक तथा तरुण पत्रकार केवल महाडिक यांना दैनिक युवक आधारतर्फे उत्कृष्ठ व प्रेरणादायी लेखणी पुरस्कार जाहीर झाला आहे त्याबद्दल सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



# डॉ.प्रशांत चव्हाण यांना राज्यस्तरीय आरोग्य रत्न पुरस्कार जाहीर

## 5 सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त खासदार निलेश लंके व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते होणार पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**
**अहिल्यानगर** -स्व. पै.किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था,श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व पै.नाना डोंगरे व्यायाम शाळा निमगांव वाघा, ता.जि. अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने,आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा 2025 दि. 5 सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त निमगाव वाघा येथील परिवार मंगल कार्यालयात संपन्न होणार असून आपल्या कार्याची पावती म्हणून हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी राज्यभरातून पुरस्कारार्थी उपस्थित राहणार आहेत.
या कार्यक्रमास सोजाई आदिवासी महिला विकास फॉउंडेशन अध्यक्ष तथा संत तुकाराम मल्टी स्पेशलिटी शिवकृपा हॉस्पिटल चे सर्वेसर्वा डायरेक्टर प्रशांत डी चव्हाण यांना देखील राज्यस्तरीय आरोग्य रत्न पुरस्कार जाहीर झाला असून 5 सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त खासदार निलेश लंके व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



वैद्यकीय तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे डॉक्टर प्रशांत चव्हाण यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याचं संस्थेचे अध्यक्ष पै. नानाभाऊ डोंगरे यांनी निवड पत्राद्वारे कळविले आहे.

# सोलर उत्पादनांचा समग्र कारखाना उभारणीसाठी

## महाराष्ट्र सरकार ‘ज्युपिटर इंटरनॅशनल’ चा करार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,प्रतिनिधी**

२५ ऑगस्ट २०२५ : नागपूरमधील बुटीबोरी भागात सौर उत्पादनांचा एक अत्याधुनिक, एकात्मिक कारखाना उभारण्याच्या दृष्टीने ज्युपिटर इंटरनॅशनल कंपनीने महाराष्ट्र सरकारशी एक सामंजस्य करार केला आहे. ज्युपिटर इंटरनॅशनल ही फोटोव्होल्टाइक सोलर सेलचे उत्पादन व सोलर एनर्जीची सोल्युशन्स या क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य कंपनी आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १०,९०० कोटी रुपयांची गुंतवणूक होईल असा अंदाज आहे. यामध्ये नवीन तंत्रज्ञानावर




आधारित सोलर सेल्सची निर्मिती आणि सोलर मॉड्यूल उत्पादन अशा संपूर्ण मूल्य साखळीचा समावेश असेल. म्हणजे, हा सोलर क्षेत्रातील एक संपूर्ण पायाभूत सुविधा निर्माण करणारा प्रकल्प असणार आहे. प्रकल्पामुळे रोजगाराच्या ८,३०० पेक्षा जास्त संधी निर्माण होतील, औद्योगिक वाढीला चालना मिळेल आणि सौर ऊर्जा क्षेत्रातील क्षमता वृद्धिंगत होईल. अलोक गरोडिया, व्यवस्थापकीय संचालक, ज्युपिटर इंटरनॅशनल लिमिटेड यांनी सांगितले,“तंत्रज्ञान, व्यापक प्रमाण आणि प्रादेशिक सक्षमीकरण यांच्या माध्यमातून भारतात अक्षय ऊर्जेचे भवितव्य निर्माण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आमची गुंतवणूक या आमच्या दीर्घकालीन बांधिलकीचे प्रतीक आहे. महाराष्ट्र सरकारकडून मिळणाऱ्या सततच्या पाठिंब्याबद्दल आणि मार्गदर्शनाबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.” ‘ज्युपिटर इंटरनॅशनल’ चे दोन कारखाने सध्या हिमाचल प्रदेशमधील बद्दी येथे सुरू आहेत. या कारखान्यांची स्थापत्य क्षमता प्रत्येकी ५०० मेगावॅट असून एकूण क्षमता १.०० गीगावॅट आहे. नागपूरचा आगामी प्रकल्प हा कंपनीचा धोरणात्मक विस्तार असणार आहे. समग्र सौर ऊर्जेचा प्लॅटफॉर्म तयार करण्याच्या कंपनीच्या धोरणाचा हा एक महत्त्वाचा भाग आहे.

# टी. एस. रहमान लेडी खातून मरियम विद्यालयात सायबर सुरक्षा व रस्ते वाहतूक सुरक्षा समुपदेशन,

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



न्हावा प्रकल्पांतर्गत टी. एस. रहमान लेडी खातून मरियम विद्यालय येथे 21 ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा आणि रस्ते वाहतूक सुरक्षा या विषयांवर मार्गदर्शनपर समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात न्हावाशेवा पोलीस स्टेशन व नवी मुंबई वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी. एम. मुजावर तसेच सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिक विशेषज्ञ विदाश्री भांगे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिक विशेषज्ञ विदाश्री भांगे यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियावरील संभाव्य धोक्यांबद्दल सखोल माहिती दिली. त्यांनी फेसबुक, स्नॅपचॅट, व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम आदी प्लॅटफॉर्मद्वारे होणाऱ्या फसवणुकीची उदाहरणे सादर करत विद्यार्थ्यांना सावध राहण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा जपण्यासाठी काही महत्वाचे सल्ले दिले, अनोळखी ॲप्स डाऊनलोड करू नयेत.अनोळखी वेबसाईट लिंकवर क्लिक टाळावे. सोशल मीडियावरील अवैध ऑफर्सना बळी पडू नये, सायबर गुन्हा घडल्यास तात्काळ सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधावा.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी. एम. मुजावर यांनी विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेबाबत जागरूक केले. त्यांनी दुचाकी वाहनचालकांसाठी हेल्मेटच्या अनिवार्य वापराबाबत, सिग्नलचे काटेकोर पालन, वाहतूक चिन्हांचे महत्त्व आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या शिबिरात हेडकॉन्स्टेबल किरण म्हात्रे, मोरे, कॉन्स्टेबल सचिन ठाकूर व आल्ते यांची विशेष उपस्थिती लाभली. विद्यालयाच्या प्राचार्या डेजम्मा पॉल (Daisamma Paul), उपमुख्याध्यापक प्रियरंजन त्रिपाठी, पर्यवेक्षक जितेंद्र महाजन तसेच अन्य शिक्षकवर्गही या वेळी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्याचे व रस्ते नियमांचे पालन करण्याचे मार्गदर्शन

ऑनलाइन ‘तीन पत्ती’ आणि ‘रम्मी’ सारख्या जुगार खेळांमध्ये अनेक विद्यार्थी अडकत आहेत, ज्यामुळे मानसिक, सामाजिक आणि आर्थिक नुकसान होत आहे. विद्यार्थ्यांनी अनोळखी ॲप्स, लिंक व सोशल मीडियावरील अवैध अमिष टाळावे,– विदाश्री भांगे, सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिक विशेषज्ञ
“रस्ता ओलांडताना सिग्नलचे पालन करा, हेल्मेट वापरा आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करा. सुरक्षित ड्रायव्हिंग हेच अपघात टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे,”– जी. एम. मुजावर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, न्हावाशेवा

# नवी मुंबईतील मतदारयादीत ७६ हजार दुबार नावे

## महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नावे वगळण्याची कॉंग्रेसची मागणी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

**नवी मुंबई** : नवी मुंबईतील मतदारयादीत ७६ हजार दुबार नावे असून महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नावे वगळण्याची लेखी मागणी कॉंग्रेसचे नवी मुंबई जिल्हा प्रवक्ते रवींद्र सावंत यांनी मा. जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हा तथा जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी, ठाणे यांच्याकडे एका निवेदनातून केली आहे.
नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील ऐरोली व बेलापुर विधानसभा मतदारसंघातील मतदारयाद्या सदोष असल्याने निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात दोन्ही विधानसभा मतदारसंघात जवळपास ७६ हजारांहून अधिक दुबार नावे आहेत. ऐरोली विधानसभा मतदारसंघात ४१ हजार ५५६ दुबार नावे आणि बेलापुर विधानसभा मतदारसंघात ३५ हजाराच्या आसपास दुबार नावे आहेत. विशेष म्हणजे ऐरोलीतही तीच नावे व बेलापुरातही तीच नावे आहेत. म्हणजेच सकाळी एकीकडे मतदान करा व दुपारनंतर दुसरीकडे मतदान करा, असा प्रकार होत असल्याचा दाट संशय आहे. इतकेच नाही तर एकाच नोडमध्ये वेगवेगळ्या मतदारसंघातही तीच तीच नावे दोन ते तीन वेळा पहावयास



मिळतात. नजरचुकीने म्हटल्यास शंभर-दोनशे, फारफार तर हजार पाचशे मतांचा गोंधळ होऊ शकतो. परंतु ७६ हजार मतांपेक्षा अधिक घोळ हे नियोजित षडयंत्र आहे. दुबार नावे मतदारयादीत घुसवून आपले राजकीय वर्चस्व कायम ठेवण्याची ही खेळी आहे व त्यासाठीच प्रशासकीय यंत्रणेचा दुरुपयोग केला जात असल्याचा संशय रवींद्र सावंत यांनी निवेदनात व्यक्त केला आहे.
दोन वेगवेगळ्या विधानसभा मतदारसंघातच नाही तर पालिकेच्या शेजारच्या मतदारसंघातही दुबार नावांचा घोळ आहे. ग्रामीण भागातील मतदारही येथील मतदारयाद्यांमध्ये घुसविण्यात आले आहेत. आम्ही याबाबत सर्व पुरावे नावानिशी सादर करत आहोत. आपणही याप्रकरणी चौकशीचे निर्देश देवून तपास करणे आवश्यक आहे. कारण महापालिका निवडणूकीत या मतदानाचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यक्षमतेवर, पारदर्शकतेवर व प्रामाणिकपणावर संशय निर्माण झाला आहे. ही सर्वच्या सर्व दुबार मतदार नावे नवी मुंबई महापालिका निवडणुकीच्या अगोदर तातडीने वगळण्यात यावीत, तसे आपण संबंधितांना निर्देश देवून सुधारीत मतदारयादी उपलब्ध करुन देण्याची मागणी रवींद्र सावंत यांनी केली आहे.
रवींद्र सावंत यांनी नवी मुंबईतील ७६ हजाराहून अधिक दुबार नावे वगळण्याची मागणी करताना निवेदन सादर केले, त्यावेळी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते संतोष शेट्टी ,अनवर हवलदार, विद्याताई भांडेकर,उत्तम पिसाळ,प्रल्हाद गायकवाड,संतोष सुतार,बाबासाहेब गायकवाड व इतर मान्यवर उपस्थित होते.